



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवारंग

२०१६-१७



## - विद्यापीठ गीत -

गीत आमुचे आकाशाचे गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे जनामनाचे गीत आमुचे जागराचे

अभंगाचे ओवीचेही
मायबोलीचे माहेर
वाऱ्यातही मराठीचे
दिवे लख्ख घरोघर

संत-महंतांचे विरागी गीत आमुचे वादळाचे

तंतु तंतु संघर्षाचा
पैठणीत भिनलेला
नक्षीतच पक्षी पक्षी
विजयाचा विणलेला
सोनपहाटेचे उदयाचे गीत आमुचे उजेडाचे

प्रज्ञेचा सूर्य नवा
शब्द शब्द उजळून गेला
समतेचा संगराचा
अर्थ ढाळून गेला

विराट विशाल संस्कृतीचे गीत आमुचे जीवनाचे

- फ. मुं. शिंदे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

### विद्यार्थी विकास विभाग

# युवारंग

२०१६-१७

## विविध योजना व उपक्रम-मार्गदर्शिका


* संपादक *

**डॉ. सुहास मोराळे**

संचालक, विद्यार्थी विकास विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद-४३१००२

# २०१६-१७



**प्रकाशक**


**डॉ. प्रदिप जबदे**
कुलसचिव



**मुख्य संपादक**

**डॉ. सुहास मोराळे**
संचालक, विद्यार्थी विकास विभाग

## संपादक मंडळ



डॉ. मुस्तजीब खान



डॉ. दासू वैद्य



डॉ. उत्तम अंभोरे



डॉ. संजय नवले

## छायाचित्रे



श्री पंकज बेडसे

## मुद्रित - शोधन



डॉ. दैवत सावंत



प्रा. दीपक खरात



विनोद लांडगे



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



## मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव

**कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य**



मा. प्रोफेसर बी.ए.चोपडे

कुलगुरू

# संदेश

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे आजच्याघडीलीला विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व व सामाजीक विकासाला चालना देणारे विद्यापीठ आहे. शिक्षणाने माणसाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि माणूस सामाजिक विकास घडवून आणतो आणि त्या वाटेवर चालतांना ज्ञानाची ही मशाल एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात देण्यासाठी विद्यापीठातील सर्व
प्राध्यापक वृंद व माझे सहकारी प्रयत्न करतांना दिसतात. प्रत्येक वर्षी आपल्या विद्यापीठाचा युवारंग हा वार्षीक अंक निघत असतो. आज युवारंग मध्ये जेंव्हा मी बघतो की विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या व कला गुणांच्या जोरावर आपल्या विद्यापीठाचे नाव राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नेले आहे. यासाठी मला अंतकरणापासून अभिमान वाटतो की मी या विद्यापीठाचा कुलगुरू आहे.

भारतातील प्रादेशिक स्तरावर नॅक चा 'अ' दर्जा मिळविणारे आपले विद्यापीठ ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना जगण्याची दिशा आणि नवचैतन्य देण्याचे काम करत आहे.
विद्यापीठातील विद्यार्थी हा कला क्रिडा साहित्य सांस्कृतीक शैक्षणीक या सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेताना दिसतो यावर्षी क्रिडा महोत्सव केंद्रीय युवक महोत्सव उत्कृर्ष युवा महोत्सव तसेच राज्यराष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले चर्चासत्र हे यशाची पावती आहेत. आपले विद्यापीठ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालते आणि डॉ बाबासाहेब आंबडेकरांचा शैक्षणीक विचार आपल्या विद्यापीठात नव्याने रुजावा यासाठी माझ्या विद्यार्थी मित्रांनी प्रत्येक श्तरांच्या जिवनात दिपस्तंभासारख्या प्रकाश निर्माण करावा यासाठी युवारंग हे आपल्यासाठी यज्ञाचे प्रमाणपत्र आहे. आणि यातुन आपले विचार तथा कलागुण झळकतांना दिसतात.

सामाजीक समता प्रस्थापित करीत असतांना शिकता शिकता जगता यावे, जगता जगता शिकता यावे, शिक्षण हेच जगणे हा विचारसुध्दा आपल्यामध्ये रुजावा आणि यातुन कृतिशील ज्ञानवंत किर्तीवंत, यशवंत विद्यार्थी घडावेत यासाठी आपण सर्वजण मिळून एकत्र येवुयात एका दिव्याने दुसऱ्या दिवा लावु दुसऱ्याने तिसऱ्या दिवा लावु असे असंख्या दिप लावू येथील विद्यार्थ्यांचे स्वप्न भव्य दिव्य असावेत व त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न करून मद्यमानवानी निवडलेल्या मार्गावरच मार्गक्रमण करावे

मा. प्रोफेसर बी.ए. चोपडे

# संदेश

कुलसचिव या नात्याने लिहिणे युवारंगमध्ये खरोखरच ही आनंददायी बाब आहे. या कारणांचा आपण परामर्श घेतला तर विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठाची विद्यार्थ्यांविषयी ची सकारात्मक भूमिका लक्षात घेतल्यास एक गोष्ट निश्चित लक्षात येते ती म्हणजे असलेली बांधिलकी  विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या कै.वसंतराव काळे कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून अगदी तळागळातला आर्थिक मागासलेला विद्यार्थीसुद्धा यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करताना आपल्याला दिसतो आहे. प्रत्येक विद्यार्थी विद्यापीठात प्रवेश घेताना एक आशा आंकाक्षाच स्वप्न घेऊन येतो ते स्वप्न पूर्ण करण्याचे काम विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठ पूर्ण करण्यासाठी अविश्रांत कष्ट घेत आहेत

विद्यापीठ ही पवित्र ज्ञानभूमी आहे त्या ज्ञानभूमीतील विद्यार्थी हा आर्थिक बाबतीत जरी गरीब असला तरी तो ज्ञानाने आणि कर्तृत्वाने खूप श्रीमंत आहे. तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना ज्ञानाचे बळ देण्याचे काम विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण विभाग अविरत करत असतो.

विद्यापीठातील विद्यार्थी संसद युवा नेतृत्व शिबीर हे आजच्या व्यवस्थेतील तरुण पिढी घडविण्याचे काम करीत आहे जेणेकरुन तरुणांचा भारतीय राजकारणात सकारात्मक प्रभाव पडावा व त्याची भारतीय राजकारणात निर्णयक्षमता वाढावी हा त्यामागील उदात्त हेतू आहे. भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश आहे आणि वर्तमानात खूप मोठया प्रमाणात लोकसंख्या लाभांश (Demographic Dividend) भारताला प्राप्त होणार आहे परंतु यासाठी तरुणांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आविष्कार युवा महोत्सव, उत्कर्ष महोत्सव किंवा क्रिडा महोत्सव असेल यामार्फत विद्यार्थ्यांच्या कौशल्य गुणांचा विकास साधण्याचे काम विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण विभाग करीत आहे.

महाराष्ट्रास  व मराठवाड्यास मोठा सांस्कृतिक व संत साहित्याचा वारसा आहे. आणि हा वारसा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून जपण्याचे काम युवा महोत्सव करीत असतो. नृत्य, साहित्य, नाट्य, चित्र, वाङ्मय या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी निव्वळ आनंददायी बाब म्हणून  न पाहता त्याकडे एक करिअर म्हणून विद्यार्थ्यांनी पहावे हा विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठाचा उदात्त दृष्टीकोन आहे. तसेच महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा जतन केला जावा हा सुद्धा ध्यास आहे.

महाराष्ट्राला छत्रपती, फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे आणि हा वारसा जपण्याचे तसेच विज्ञानाची कास धरुन बुध्दीप्रामाण्यवाद अंगिकरण्याचे काम हे विद्यापीठ करीत आहे आणि करीत राहणार आहे. शेवटी समारोप करतांना मी हा आशावाद व्यक्त करतो की येथील विद्यार्थ्यांने फिनिक्स पक्षाप्रमाणे ज्ञानाच्या क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यावी  इतकाच प्रखर आशावाद...

डॉ. प्रदिप जबदे
कुलसचिव

# संपादकीय

**।। हे ज्ञानिची पवित्रता । ज्ञानीचि आथि ।।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी कार्य करते. म्हणूनच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे माहेर घर म्हणून आपल्या विद्यापीठाची ओळख आहे. अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या क्षेत्रातसुध्दा आपले विद्यापीठ अग्रेसर आहे. या विद्यापीठातील विद्यार्थी देशाच्या हितासाठी प्रथम चांगला नागरिक निर्माण व्हावा, तसेच अध्ययन, अध्यापन व संशोधना बरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देऊन एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून घडावे यासाठी सुध्दा विद्यापीठ व विद्यापीठातील मा. कुलगुरू महोदय, मा. कुलसचिव तसेच शिक्षक व कर्मचारी वर्ग नेहमीच प्रयत्नशील असतात.

आपल्या विद्यापीठामध्ये दलित, बहुजन, अल्पसंख्यांक व होतकरू विद्यार्थ्यांचे हित जोपासले जाते. वाडी, तांडयावरील, तळागाळातील विद्यार्थी हा उच्च शिक्षणापासून वंचित राहु नये म्हणून विद्यापीठाने कै. वसंतराव काळे कमवा आणि शिका स्वाभिमान शिक्षण योजना ही विद्यार्थ्यांला आर्थिक बळ देणारी आणि स्वाभिमानी विद्यार्थी घडविणारी योजना अशी तिची ओळख आहे. दर वर्षी हजारो विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सज्ज होतात व स्वाभिमानाने जीवन जगतात.

आजचे युग हे विज्ञान युग असल्यामुळे आपल्या समाजात अनेक प्रकारची नवनवी स्थित्यंतरे घडत असतात. अशा या धावपळीच्या युगात विद्यार्थी टिकून राहावा यासाठी विद्यापीठाच्या वतीने तत्वचिंतन, विचारवंताच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाते. याचा लाभही आपले विद्यार्थी घेतात. व यशाच्या भराऱ्या मारायला मोकळे हातात. ''जागतिकीकरणामुळे सातासमुद्रा पलीकडचा माणूस जवळ वाटू लागला आहे. परंतु जवळचा माणूस दूर जाता कामा नये '' हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, कार्यक्रमातुन शिकविले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला नैसर्गिक वातावरणाचा वारसा आहे. इथल्या वातावरणातील विद्यार्थी मुक्तपणे श्वास आणि आस्वाद घेताना दिसून येतो. यामुळे येथील विद्यार्थी समता, स्वातंत्र्य, यांना वाव मिळवावा म्हणून केंद्रीय युवक महोत्सव आयोजित करणे, तसेच एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडावा यासाठी विद्यार्थ्यांना राज्य व देश पातळीवर विविध शिबीरांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व दिले जाते. वर्षभरात विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणे हे विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख कार्य ठरते. या सर्व योजना व उपक्रमाची अमलबजावणी शिस्तबध्द व योग्यरीतीने सुव्यवस्थित होण्यासाठी 'युवारंग'ही पुस्तिका विद्यार्थी कल्याण विभागाने प्रसिध्द केली आहे. येणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला हे युवारंग आपल्या हाती देताना मनापासून आनंद होत आहे.

डॉ. सुहास मोराळे
संचालक, विद्यार्थी विकास

# विद्यापीठातील अधिकारी वर्ग



प्रोफेसर सतिश पाटील
विशेश कार्यकारी अधिकारी



डॉ. प्रदिप जबदे
कुलसचिव



डॉ. सुहास मोराळे
संचालक, विद्यार्थी विकास



श्री. शंकर चव्हाण
वित्त व लेखाधिकारी



डॉ. डी. एम. नेटके
संचालक परीक्षा व मूल्यमापन

# युवक महोत्सव सल्लागार व संयोजन समिती (२०१६-१७)



प्रोफेसर बी. ए. चोपडे
(अध्यक्ष)



डॉ. संजय नवले
(सदस्य)



श्री. संभाजी भोसले
(सदस्य)



श्री. गजानन सानप
(सदस्य)



डॉ. दासू वैद्य
(सदस्य)



डॉ. मुस्तजीब खान
(सदस्य)



डॉ. अशोक बंडगर
(सदस्य)



डॉ. संजय मोहोड
(सदस्य)



डॉ. जयंत शेवतेकर
(सदस्य)



डॉ. दिलीप बडे
(सदस्य)



डॉ. लक्ष्मीकांत शिंदे
(सदस्य)



डॉ. सुधाकर शेंडगे
(सदस्य)



डॉ. सुहास मोराळे
(सदस्य सचिव)

## वसतिगृह नियंत्रण व व्यवस्थापन समिती सदस्य


डॉ. प्रदीप जबदे
(अध्यक्ष) कुलसचिव


श्री. शंकरराव चव्हाण (सदस्य)
(वित्त व लेखाधिकारी)


प्रोफेसर वाल्मिक सरवदे
(सदस्य)


डॉ. गजानन सानप
(सदस्य)


प्रोफेसर सुरेश गायकवाड
(सदस्य)


प्रोफेसर प्रविण वक्ते
(सदस्य)


प्रोफेसर स्मिता अवचार
(सदस्य)


प्रोफेसर वंदना हिवराळे
(सदस्य)


डॉ. राम चव्हाण
(सदस्य)


डॉ. भगवान साखळे
(सदस्य)


श्री. आर. डि. काळे
(सदस्य)


डॉ. सुहास मोराळे
(सदस्य-सचिव)

## कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा आणि शिका)


डॉ. पुरूषोत्तम देशमुख

डॉ. नंदिता पाटील


श्री. जी. एस. पालकर

## वसतीगृह अधिकारी व अधिक्षिका



डॉ. नारायण पंडुरे (वार्डन)
छत्रपती शिवाजी महाराज मुलांचे वसतिगृह क्र.१



डॉ. भास्कर साठे (वार्डन)
सिध्दार्थ संशोधन छात्र मुलांचे वसतिगृह क्र.२



श्री. कुमार व्ही. एस. (वॉर्डन)
कर्मचारी भाऊसाराव पाटील मुलांचे वसतिगृह क्र.३



डॉ. मदन सुर्यवंशी (वार्डन)
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मुलांचे वसतिगृह क्र.४



श्री. संजय शिंदे (वॉर्डन)
शहिद भगतसिंग मुलांचे वसतिगृह क्र.५



डॉ. विलास इप्पर (वार्डन)
विद्यार्थी विश्रामगृह



डॉ. सोनाली क्षीरसागर (वॉर्डन)
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह क्र. १



डॉ. बीना सेंगर (वार्डन)
मातोश्री जिजाऊ मुलींचे वसतिगृह क्र.२



श्रीमती गिरीबाला बोंदले (वॉर्डन)
मुलींचे वसतिगृह क्र.३



डॉ. श्रीमती सविता बहिरट (वॉर्डन)
नायलेट व प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह



डॉ. संतवना मिश्रा (वॉर्डन)
रमाबाई आंबेडकर अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह



डॉ. प्रतिभा अहिरे
यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्त केलेले आर्थिक दृष्ट्या मागास मुलींचे वसतिगृह



श्रीमती छाया जाहगिरदार



श्री. बी.जे जाधव

## एन. एस. एस. विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रम अधिकारी


डॉ. भिमराव भोसले
(कार्यक्रम समन्वयक)


डॉ. विलास इप्पर
(कार्यक्रम अधिकारी)


डॉ. निर्मला जाधव
(कार्यक्रम अधिकारी)

## विद्यार्थी विकास विभाग कर्मचारी वृंद


श्री. प्रकाश आकडे


श्री. एच. के. साठे


श्री. आर. टी. साबळे


श्री. राहुल जावळे


कु. कल्पना भागवत


श्री. आर. एस. पवार


श्री. सय्यद जमील

## १९ सप्टेंबर २०१६

# उद्घाटन समारंभ


































२२ सप्टेंबर
२०१६

# समारोप

पारितोषिक
वितरण समारंभ




## मा. कुलगुरू महोद्यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प '' जलयुक्त विद्यापीठ ''











## मा. कुलगुरू महोदयांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प " जलयुक्त विद्यापीठ "












## मा. कुलगुरू महोदयांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प '' जलयुक्त विद्यापीठ ''

















छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव २०१७



छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव २०१७



८ मार्च जागतिक महिला दिन २०१७





८ मार्च जागतिक महिला दिन २०१७





जलयुक्त विद्यापीठ २०१७





११ एप्रिल महात्मा ज्योतिबा फुले जयंती २०१७





भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त व्याख्यान
व थामस जेफरसन ॲण्ड, डॉ. बी. आर. आंबेडकर कम्पॅरिटीव्ह स्टडी पुस्तक प्रकाशन

## १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव २०१७

















१ मे महाराष्ट्र दिन



१ मे महाराष्ट्र दिन ध्वजारोहन











१२ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६० व्या महापरिनिर्वाण दिन





२६ नोव्हेंबर भारतीय
संविधान दिन २०१७









२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती





२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान





स्वच्छता अभियान





कमवा आणि शिका येथे पोळा सन साजरा करताना





६८ वा मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन





६८ वा मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनानिमित्त नाटक सादर करताना





२३ ऑगस्ट ५८ वा वर्धापन दिन व जीवनगौरव पुरस्कार समारंभ







२३ ऑगस्ट लंचहोमचे उद्घाटन २०१६






२ रा आंतरराष्ट्रीय योग दिवस

## १४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' २०१६ उद्घाटन समारंभ













## १४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' २०१६













१४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' २०१६















## १४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' २०१६
















## १४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' २०१६ बक्षिस वितरण समारंभ












२०१६ 'इंद्रधनुष्य' विजेता संघ मुंबई विद्यापीठ, मुंबई



२०१६ 'इंद्रधनुष्य' उपविजेता संघ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## Vice-Chancellors of the university

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri S. R. Dongerkery | 19/06/1958 | To | 18/06/1964 |
| 2 | Dr. N. R. Tawde | 19/06/1964 | To | 15/10/1971 |
| 3 | Prin. R. P. Nath | 16/10/1971 | To | 15/01/1975 |
| 4 | Dr. V. G. Ganla | 26/07/1973 | To | 30/09/1973 |
| 5 | Shri S. R. Kharat | 16/01/1975 | To | 13/12/1976 |
| 6 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 24/12/1975 | To | 24/03/1976 |
| 7 | Shri. D. N. Kappor (IAS) (Incharge) | 14/12/1976 | To | 06/06/1977 |
| 8 | Dr. B. R. Bhosle(IAS) (Incharge) | 07/06/1977 | To | 03/05/1982 |
| 9 | Dr. B. H. Rajurkar | 13/05/1978 | To | 06/06/1978 |
| 10 | Dr. A. M. Vare | 27/02/1981 | To | 13/03/1981 |
| 11 | Shri.S. G. Gokhale (IPS) | 04/05/1982 | To | 07/07/1982 |
| 12 | Prin. G. R. Mhaisekar | 08/07/1982 | To | 20/08/1983 |
| 13 | Shri. S.G. Gokhale (IPS) | 21/03/1983 | To | 01/05/1983 |
| 14 | Shri. Y. L. Rajwade (IAS) (Incharge) | 21/08/1983 | To | 04/10/1983 |
| 15 | Justice M. P. Kanade | 05/10/1983 | To | 15/06/1985 |
| 16 | Shri. A. N. Batabyal (IAS) (Incharge) | 18/06/1985 | To | 28/06/1985 |
| 17 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 29/06/1985 | To | 31/10/1985 |
| 18 | Dr. B. H. Rajurkar | 01/11/1985 | To | 06/03/1988 |
| 19 | Shri. A. L. Bongirwar (IAS) (Incharge) | 07/03/1988 | To | 21/08/1988 |
| 20 | Shri. Govind Swarup (IAS) (Incharge) | 22/08/1988 | To | 05/09/1988 |

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## Vice-Chancellors of the university

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year |
|---|---|---|
| 21 | Prin. S. A. Bhosale | 06/09/1988 To 16/09/1991 |
| 22 | Prof, V.B.Ghuge | 16/09/1991 To 14/01/1994 |
| 23 | Prin K. T. Thale (Incharge) | 17/04/1993 To 23/04/1993<br>10/08/1993 To 22/08/1993 |
| 24 | Shri. V. N. Karandikar (IAS) (Incharge) | 16/09/1994 To 03/11/1994 |
| 25 | Prin. Dr. Shivraj B. Nakade | 04/11/1994 To 03/11/1999 |
| 26 | Prof. Dr. B. G. Pachpatte (Incharge) | 11/08/1998 To 27/08/1998 |
| 27 | Dr. V. S. Lomte (Incharge) | 04/11/1999 To 20/12/1999 |
| 28 | Mr. K. P. Sonawane | 21/12/1999 To 20/12/2004 |
| 29 | Dr. D. G. Dhuley (Incharge) | 20/04/2001 To 30/04/2001<br>14/05/2001 To 27/05/2001<br>18/07/2002 To 08/08/2002 |
| 30 | Dr. H. A. Gani (Incharge) | 04/10/2004 To 21/10/2004<br>29/11/2004 To 10/12/2004 |
| 31 | Shri. K. B. Bhoge (IAS) (Incharge) | 21/12/2004 To 04/06/2005 |
| 32 | Prof. Nagnath Kottapalle | 05/06/2005 To 04/06/2010 |
| 33 | DR. A. G. Khan (Incharge) | 11/02/2009 To 28/02/2009 |
| 34 | Shri Bhaskar Mundhe (IAS) (Incharge) | 05/06/2010 To 22/09/2010 |
| 35 | Prin. Dr. K. B. Patil | 23/09/2010 To 04/01/2011 |
| 36 | Prof. Dr. V. M. Pandharipande | 05/01/2011 To 28/3/2013 |
| 37 | Prof. B. A. Chapade | 04/06/2014 To |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## मा. कुलसचिव

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री. एम.बी. चिटणीस | १९/०६/१९५८ ते ३०/०६/१९६८ |
| २ | श्री. व्ही.के. धामनकर | ०१/०७/१९६८ ते २०/०४/१९७५ |
| ३ | डॉ. व्ही.व्ही. बोरकर (प्रभारी) | २१/०४/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ४ | श्री. एच.एस. मानविकर (प्रभारी) | ०८/०५/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ५ | श्री. एस.बी. चव्हाण (प्रभारी) | २०/०४/१९७६ ते १९/१०/१९७६ |
| ६ | श्री. एम.पी. लवाने | २०/१०/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ७ | श्री. व्ही.के. धामनकर (प्रभारी) | ०२/०२/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ८ | डॉ. जी.एस. अुर (प्रभारी) | २१/०४/१९७९ ते ०२/०७/१९७९ |
| ९ | डॉ. बी.एच. राजुरकर (प्रभारी) | ०३/०७/१९७९ ते १२/११/१९७९ |
| १० | डॉ. एम.जी. कुलकर्णी | १३/११/१९७९ ते १३/०१/१९८० |
| ११ | डॉ. बी.एच. राजुरकर | १४/०१/१९८० ते ०८/०९/१९८० |
| १२ | श्री. एस.बी. पाटील (प्रभारी) | ०९/०९/१९८० ते ३१/०५/१९८१ |
| १३ | डॉ. बी.एम. पाटोदेकर | ०१/०६/१९८१ ते ११/०९/१९८९ |
| १४ | श्री. एस.बी.पाटील | २७/११/१९८८ ते ११/०९/१९८९ |
| १५ | प्रा. जी.वाय.पाथ्रीकर | १२/०९/१९८९ ते २३/०४/१९९१ |
| १६ | प्राचार्य, बी.आर. आरबाड | २४/०४/१९९१ ते २५/०८/१९९२ |
| १७ | डॉ. पी.पी. कार्यकर्ते | २६/०८/१९९२ ते २३/०२/१९९३ |
| १८ | डॉ. एम.एन. फरुकी | २४/०२/१९९३ ते ०२/०२/१९९४ |
| १९ | डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | २५/१०/१९९३ ते ३०/१२/१९९३ |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## मा. कुलसचिव

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| २० | डॉ. जी.बी.शिंदे | ०३/०२/१९९४ ते ०६/१०/१९९६ |
| २१ | प्रा.डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | ०७/१०/१९९६ ते ३१/०१/१९९७ |
| २२ | डॉ. श्रीमती पी.बी. सोमवंशी (प्रभारी) | ०१/०२/१९९७ ते ०४/०२/१९९७ |
| २३ | डॉ. पी.एम. बोरा | ०५/०२/१९९७ ते १९/११/१९९७ |
| २४ | डॉ. एल.आर. नागरगोजे | २०/११/१९९७ ते १९/०१/२००२ |
| २५ | डॉ. पी.एम. बोरा (प्रभारी) | २०/११/२००२ ते १९/१२/२००२ |
| २६ | डॉ. जी.जी. सुरासे | ३०/१२/२००२ ते ३०/११/२००७ |
| २७ | डॉ. ए.एम. चव्हाण (प्रभारी) | ०१/१२/२००७ ते २७/०३/२००८ |
| २८ | डॉ. डी.व्ही. मुळे | २५/०३/२००८ ते २४/०३/२००८ |
| २९ | प्रा. डॉ. एम.एस. काचोळे (प्रभारी) | २५/०३/२००८ ते २५/०७/२०११ |
| ३० | डॉ. एस.टी. सांगळे (प्रभारी) | २६/०७/२०११ ते १९/१२/२०११ |
| ३१ | डॉ. डी.आर. माने | २०/१२/२०११ ते ०६/०१/२०१५ |
| ३२ | प्रोफेसर डॉ. सुरेश गायकवाड (प्रभारी) | ०६/०१/२०१५ ते १५/०१/२०१५ |
| ३३ | प्रोफेसर एम. डी. शिरसाठ (प्रभारी) | १५/०१/२०१५ ते २१/०१/२०१५ |
| ३४ | प्रोफेसर के. व्ही काळे (प्रभारी) | २४/०१/२०१५ ते २१/०५/२०१५ |
| ३५ | डॉ. गणेश मंझा (प्रभारी) | २१/०५/२०१५ ते २१/०५/२०१५ |
| ३६ | डॉ. एम. डी. शिरसाठ | १६/०९/२०१५ ते ०२/०२/२०१६ |
| ३७ | डॉ. एम. ए. लोखंडे | ०२/०२/२०१६ ते ३१/०५/२०१६ |
| ३८ | श्री. डी. बी. भरड | ३१/०५/२०१६ ते ११/०७/२०१६ |
| ३९ | प्राचार्य डॉ. प्रदिप जबदे | ११/०७/२०१६ ते |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

### संचालक व कार्यकाळ

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले | ०१/०९/१९८९ ते ०२/०७/१९९२ |
| २ | डॉ. डी.जी. धुळे | ०३/०७/१९९२ ते ०७/०५/१९९३ |
| ३ | डॉ. सुदाम जाधव | १७/०६/१९९३ ते १७/०६/१९९६ |
| ४ | डॉ. सुधीर गव्हाणे | १८/०६/१९९६ ते ०३/१२/१९९९ |
| ५ | डॉ. अशोक हजारे (अतिरिक्त कार्यभार) | ०४/१२/१९९९ ते ०६/०८/२००० |
| ६ | डॉ. वाय.के. खिल्लारे | ०७/०८/२००० ते ०६/०८/२००२ |
| ७ | डॉ. एस.टी. सांगळे | ०७/०८/२००२ ते १६/१२/२००४ |
| ८ | डॉ. के.बी. शेजुळे | १६/१२/२००४ ते १३/०३/२००७ |
| ९ | डॉ. व्ही.एल. सिरसाट | १३/०३/२००७ ते १३/०३/२००९ |
| १० | कॅप्टन डॉ. एस.टी. गायकवाड | १३/०३/२००९ ते २४/०७/२०११ |
| ११ | प्रा.डॉ. वाल्मिक सरवदे | २५/०७/२०११ ते ३१/०९/२०१३ |
| १२ | डॉ. चेतना प्र. सोनकांबळे | ०१/१०/२०१३ ते १३/०५/२०१५ |
| १३ | डॉ. सुहास मोराळे | १३/०५/२०१५ ते |

## रॅगींग प्रतिबंधक समिती

| अ.क्र. | पदाधिकाऱ्यांचे नाव | पदनाव | दुरध्वनी क्र. व ईमेल |
|---|---|---|---|
| १ | डॉ. प्रतिभा पाटील<br>लोकप्रशासन विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | अध्यक्ष | मो. ९४२०९२९२२२ |
| २ | डॉ. रत्नदिप देशमुख<br>संगणकशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | सदस्य | मो. ९४२३१४७४६६<br>ईमेल. rahthodeep_deshmukh@yahoo.com |
| ३ | डॉ. सुधीर गव्हाणे<br>जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | सदस्य | मो. ९०९६९५००३५<br>ईमेल. profgsudhir@gmail.com |
| ४ | प्रा. भिमराव भोसले<br>इंग्रजी विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | सदस्य | मो. ९७६५३५५९७७<br>का. ०२४०-२४०३१३४<br>ईमेल. bhoslebhimrao9@gmail.com |
| ५ | डॉ. सुहास मोराळे<br>संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | सचिव | मो. ९४२२२४२७११<br>का. ०२४०-२०४०३१३२<br>ईमेल. dsw@bamu.ac.in |

## विद्यार्थी विभाग विद्यार्थी परिषद व महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद निवडणुक समिती

| | |
|---|---|
| प्रोफेसर एम. डी. शिरसाट | प्रोफेसर प्रतिभा पाटील |
| प्रोफेसर कॅप्टन डॉ. सुरेश गायकवाड | डॉ. राम चव्हाण |
| डॉ. सय्यद अझरूद्दीन | डॉ. मुस्तजीब खान |
| डॉ. प्रकाश शिरसाट | प्रोफेसर डॉ. वंदना हिवराळे |
| डॉ. पी. बी. पापडीवाल | डॉ. मदनलाल सुर्यवंशी |
| डॉ. पुरूषोत्तम देशमुख | डॉ. नंदकुमार मोराळे |
| श्रीमती स्मिता चावरे | डॉ. सुहास मोराळे |
| विधी सल्लागार | संचालक, विद्यार्थी कल्याण |

## कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा आणि शिका) मार्गदर्शन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| प्रोफेसर सुधीर गव्हाणे | डॉ. प्रविण वक्ते | डॉ. पराग हासे | डॉ. विलास इप्पर |
| डॉ. राजेश रगडे | डॉ. राजेश करपे | डॉ. नारायण बोराडे | डॉ. गणेश कुलकर्णी |
| श्री. निवृत्ती गजभारे | श्री. किशोर निर्मल | डॉ. सुहास मोराळे | |

## विद्यार्थी सहाय्य निधी

प्रोफेसर सुधीर गव्हाणे (अध्यक्ष)

प्रोफेसर किशन धाबे

डॉ. जयश्री सुर्यवंशी

डॉ. हमीद खान

डॉ. सुहास मोराळे

डॉ. आनंद वाघ

डॉ. पराग हासे

डॉ. पुरूषोत्तम देशमुख

डॉ. राजेश करपे

## वसतीगृह नियंत्रण व व्यवस्थापन समिती सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. प्रदीप जबदे (अध्यक्ष)<br>कुलसचिव | श्री. शंकरराव चव्हाण (सदस्य)<br>वित्त व लेखाधिकारी |
| डॉ. गजानन सानप (सदस्य) | प्रोफेसर वाल्मिक सरवदे (सदस्य) |
| प्रोफेसर सुरेश गायकवाड (सदस्य) | प्रोफेसर प्रविण वक्ते (सदस्य) |
| प्रोफेसर स्मिता अवचार (सदस्य) | प्रोफेसर वंदना हिवराळे (सदस्य) |
| डॉ. राम चव्हाण (सदस्य) | डॉ. भगवान साखळे (सदस्य) |
| श्री. आर. डि. काळे (सदस्य) | डॉ. सुहास मोराळे (सदस्य-सचिव) |

## व्याख्यानमाला/शिबीर मार्गदर्शन समिती

| | |
|---|---|
| प्रोफेसर सतीश पाटील (अध्यक्ष)<br>संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ | श्री. शंकरराव चव्हाण (सदस्य)<br>वित्त व लेखाधिकारी |
| डॉ. दासू वैद्य (सदस्य)<br>मराठी विभाग | डॉ. राजेश रगडे (सदस्य)<br>पर्यटनशास्त्र विभाग |
| डॉ. आनंद वाघ (सदस्य)<br>आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग | डॉ. उत्तम अंभोरे (सदस्य)<br>इंग्रजी विभाग |
| डॉ. भारती गोरे (सदस्य)<br>हिंदी विभाग | डॉ. सुहास मोराळे (सदस्य-सचिव)<br>संचालक, विद्यार्थी विकास |

## एन. एस. एस. विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रम अधिकारी

डॉ. भिमराव भोसले
कार्यक्रम समन्वयक

डॉ. विलास इप्पर
कार्यक्रम अधिकारी

डॉ. निर्मला जाधव
कार्यक्रम अधिकारी

१४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव

# इंद्रधनुष्य २०१६

## - व्यवस्थापन समिती -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रोफेसर बी. ए. चोपडे | मा. कुलगुरू | सदस्य |
| २ | डॉ. प्रदिप जबदे | मा. कुलसचिव | सदस्य |
| ३ | प्रोफेसर वाल्मिक सरवदे | प्राध्यापक | सदस्य |
| ४ | प्रोफेसर सुरेश गायकवाड | प्राध्यापक | सदस्य |
| ५ | प्रोफेसर कल्याण शेजुळ | प्राध्यापक | सदस्य |
| ६ | प्रोफेसर सय्यद अझरूद्दीन | प्राध्यापक | सदस्य |
| ७ | प्रोफेसर राजेश रगडे | प्राध्यापक | सदस्य |
| ८ | प्राचार्य प्रदिप दुबे | संचालक, शारिरीक शिक्षण व क्रिडा विभाग | सदस्य |
| ९ | डॉ. भिमराव भोसले | कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य |
| १० | डॉ. राम च्व्हाण | प्राध्यापक | सदस्य |
| ११ | श्री. आर. टी. काळे | कार्यकारी अभियंता | सदस्य |
| १२ | डॉ. सुहास मोराळे | संचालक, विद्यार्थी विकास | सदस्य व सचिव |

## - आयोजन समिती -

| | | |
|---|---|---|
| प्रोफसेर बी. ए. चोपडे | मा. कुलगुरू | अध्यक्ष |
| डॉ. गजानन सानप | नियामक मंडळ सदस्य | स्वागत अध्यक्ष |
| प्रोफेसर सतीश पाटील | संचालक बी.सी.यु.डी. | सदस्य |
| डॉ. प्रदीप जबदे | कुलसचिव | सदस्य |
| श्री. शंकर चव्हाण | वित्त व लेखाधिकारी | सदस्य |
| डॉ. संजय नवले | प्राध्यापक | सदस्य |
| डॉ. दासू वैद्य | प्राध्यापक | सदस्य |
| डॉ. मुस्तजीब खान | प्राध्यापक | सदस्य |
| श्री. संभाजी भोसले | - | सदस्य |
| डॉ. सुहास मोराळे | संचालक, विद्यार्थी विकास | सदस्य सचिव |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,
## विद्यार्थी विकास
## वार्षिक अहवाल
### (शैक्षणिक वर्ष २०१६-१७)

- ०१ जुलै २०१६ रोजी सकाळी ७.०० वाजता विद्यापीठ परिसरातील सोनेरी महल शेजारी एक लाख लिंबोळ्यांची पेरणी केली असून मा. हरिभाऊ बागडे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानसभा, मुंबई हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. तसेच मा. उमाकांत दांगट, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
- २१जुलै २०१६ रोजी मा. उमाकांत दांगट, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे, श्री. सर्जेराव ठोंबरे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते जलयुक्त विद्यापीठ प्रकल्प अंतर्गत विद्यापीठ परिसरातील तलावातील पाण्याचे जलपूजन करण्यात आले.
- दि.२५ जुलै २०१६ रोजी केंद्रीय युवक महोत्सवाच्या सलागार समितीची बैठक घेऊन बैठकीमध्ये एकमताने केंद्रीय युवक महोत्सव श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथे घेण्याचे ठरले.
- ६ ऑगस्ट २०१६ रोजी विद्यापीठामध्ये पहिला हेरीटेज वॉकचे आयोजन केले. सोनेरी महल, इतिहास वस्तुसंग्रहालय, ग्रंथालय इ. ठिकाणाहून ही वॉक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी मा. उमाकांत दांगट, विभागीय आयुक्त, मा. निधी पांडे, जिल्हाधिकारी तसेच कार्यलयाचे तीन अधिकारी यांचा सहभाग होता.
- मा. विभागीय आयुक्त यांनी दि. १० ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १०.०० ते ०६.०० या दरम्यान मराठवाड्यातील शेतीचे भवितव्य या परिषदेचे आयोजन विद्यापीठ नाट्यगृहामध्ये झोलो. या परिषदेचे उद्घाटन मा. राज्यपाल श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव यांच्या हस्ते झाले होते.
- दि. १० ऑगस्ट २०१६ रोजी मा. कुलगुरु महोद्य यांच्या अध्यक्षतेखाली व मा. डॉ. प्रशांत नारन्नवरे जिल्हाधिकारी उस्मानाबाद स्वागताध्यक्ष केंद्रिय युवक महोत्सव, तुळजापूर यांची उपस्थिती आढावा बैठक संपन्न झाली.
- राजर्षी शाहू महाराज वक्तृत्व स्पर्धा : - १२ ऑगस्ट २०१६ रोजी राजर्षी शाहु महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, वसतीगृह चळवळीचे जनक-राजर्षी शाहु महाराज, भारतीय आरक्षणाचे जनक- राजर्षी शाहु महाराज, राजर्षी शाहु महाराज आणि सामाजिक सुधारणा, राजर्षी शाहु महाराज आणि वेदोक्त प्रकरण, स्त्रीयांचे कैवारी राजर्षी शाहु महाराज या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेला पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील ''सत्यवादीकार'' यांच्या देणगीतून मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून बक्षीस देण्यात येते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातून आणि विद्यापीठाच्या विभागातून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेमध्ये ३ पारितोषिक प्राप्त झाले. विद्यापीठाच्या

वर्धापनदिनी या विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

- स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट) :- विद्यापीठाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यदिन दि. १५.०८.२०१६ रोजी इतिहास वस्तूसंग्रहालयाच्या हिरवळीवर मा. कुलगुरु महोदय प्रोफेसर बी. ए. चोपडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला.

- विद्यापीठ वर्धापनदिन (२३ ऑगस्ट) :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापनदिनी दि. २३ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ८.४५ वा. मा. कुलगुरु यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर ०८.५० वाजता विद्यापीठ नाट्यगृहात आयोजित विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून मा. प्रोफेसर वेदप्रकाश, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली हे उपस्थित होते. तसेच ''जीवन गौरव पुरस्कार'' सन्मानित व्यक्ती मा. डॉ. सुखदेव थोरात (शिक्षण), मा. डॉ. अशोक कुकडे (वैद्यकीय सेवा, संशोधन व समाजकार्य), मा. डॉ. गंगाधर पानतावणे (साहित्य), मा. डॉ. उमाकांत दांगट (प्रशासन, कृषी जलसंधारण कार्य), व मा. ॲड. भगवानराव देशपांडे (विधी) यांना ''जीवन गौरव पुरस्कार'' देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रम मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे हे अध्यक्षस्थानी होते.

या कार्यक्रमामध्ये विद्यापीठाच्या विविध परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच आदर्श परीक्षा केंद्र पुरस्काराचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

- प्रशासकीय इमारती समोरील लंचहोम चे उद्‌घाटन मा. प्रोफेसर वेदप्रकाश, अध्यक्ष युजीसी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मा.कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे, कुलसचिव डॉ. प्रदीप जबदे, संचालक विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. सुहास मोराळे इ. उपस्थित होते.

- विद्यार्थी कल्याण विभाग दैनिक दिव्यमराठी, उद्यान विभाग यांच्यावतीने मा. प्रोफेसर वेदप्रकाश, अध्यक्ष युजीसी व मा.कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांच्या हस्ते पिंपळ बोधीवृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

- दिनांक ०५.०९.२०१७ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहात शिक्षकदिन कार्यक्रमानिमीत्त आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास अध्यक्ष प्रोफेसर बी. ए. चोपडे, कुलगुरु महोदय उपस्थित होते.

- मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन (१७ सप्टेंबर) :- 'मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन' शनिवार, दि.१७ सप्टेंबर २०१६ रोजी साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने सकाळी ठीक ८.२५ वाजता विद्यापीठ नाट्यगृह येथे ध्वजारोहण झाले. त्यानंतर सकाळी ०८.३० वाजता विद्यापीठ नाट्यगृहात विद्यापीठाच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्रामातील ०१. मा.बन्सीधरराव जाधव, माजी अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक गौरव समिती, महाराष्ट्र राज्य ०२. मा. बाबासाहेब राणू माने, टाकळगाव ०३. मा. देविदास नाथा कदम, टाकळगाव, व ०४. मा. ज्ञानोबा तुकाराम गव्हाणे, टाकळगाव या स्वातंत्र्य सैनिकांचा गौरव करण्यात आला आहे. नाट्यशास्त्र विभागातर्फे डॉ. जयंत शेवतेकर दिग्दर्शित मराठवाड्याची मुक्तिगाथा या महानाट्याचे

सादरीकरण करण्यात आले.

- २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा केंद्रीय युवक महोत्सव अंकुर, किरण आशेचा वेध आकाशाचा श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूरचे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, नळदूर्ग रोड, तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथे दि. १९ सप्टेंबर २०१६ ते दि. २२ सप्टेंबर २०१६ या दरम्यान यशस्वी संपन्न झाला. महोत्सवात महाविद्यालयांचा सहभाग उच्चांक गाठणारा ठरला. युवक महोत्सवाची थिम शेतकऱ्यांच्या जीवनातील नवी उमेद अशी असून सहभागी महाविद्यालयामध्ये सर्व कलाप्रकारामध्ये या थिमचे प्रतिबिंब दिसले. केंद्रीय युवक महोत्सवाचे स्वागताध्यक्ष मा. डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद तथा अध्यक्ष, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर हे होते. केंद्रीय युवक महोत्सवाचे उद्‌घाटन मा. मंगेश देसाई, सिने-अभिनेता यांच्या हस्ते झाले असून मा.आ. मधुकरराव चव्हाण हे प्रमुख उपस्थित होते. महोत्सवामध्ये सर्व कलाप्रकारांचे उत्तम सादरीकरण झाले. सदरील युवक महोत्सवाचा समारोप दि. २२ सप्टेंबर २०१६ रोजी मा. मकरंद अनासपुरे, सिने-अभिनेता यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते. मा. ॲड. मंजूषाताई मगर, नगराध्यक्षा, तुळजापूर तथा विश्वस्त श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी संस्थान, तुळजापूर, डॉ. प्रदीप जबदे, कुलसचिव, श्री. एन. डी. पेरगाड, प्राचार्य तथा संयोजक श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, श्री. संभाजी भोसले, अध्यक्ष, स्थानिक संयोजक समिती, डॉ. सुहास मोराळे, संचालक, विद्यार्थी विकास कल्याण हे उपस्थित होते.

- ऑक्टोंबर २०१६ महिन्यामध्ये इंद्रधनुष्य २०१६ यशस्वी होण्याकरिता मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली मॅरोथॉन बैठका घेऊन आयोजन समिती व व्यवस्थापन समिती बैठक घेवून इंद्रधनुष्य महोत्सवासाठी मा. राज्यपाल महोद्यांच्या कार्यालयाने गठीत केलेल्या निरीक्षण व देखरेख, वित्तीय व्यवस्थापन समितीच्या सूचनेप्रमाणे तयारी केली.

- १४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव इंद्रधन्युष्य २०१६, दि. ०५ नोव्हेबर ते ०९ नोव्हेबर २०१६ या दरम्यान विद्यापीठ परिसरामध्ये यशस्वी संपन्न झाला. यामध्ये महाराष्ट्रातील एकुण २० विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. यासाठी विविध ३१ समित्यांचे प्रमुख व त्यातील १५० सदस्य व १०० विद्यार्थी स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले होते. उद्‌घाटन समारंभ दि. ५ नेव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य देवगिरी रंगमंच येथे प्रसिध्द सिने अभिनेता मा. श्री. रझा मुराद यांच्या हस्ते उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला असून समारोप दि. ९ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता देवगिरी मुख्य रंगमंच येथे प्रसिद्ध सिने अभिनेत्री अमृता खानविलकर यांच्या हस्ते समारोप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा. नलिनी चोपडे, प्रोफेसर सतीश पाटील, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. प्रदीप जबदे, कुलसचिव, डॉ. सुहास मोराळे, संचालक विद्यार्थी कल्याण विभाग यांची उपस्थिती होती.

- या महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्ये म्हणजे हा महोत्सव खऱ्या अर्थाने माहिती व तंत्रज्ञानाचा परिपूर्ण वापर करुन होणारा महाराष्ट्रातील पहिला महोत्सव ठरेल. यासाठी आयसिम अभियांत्रिकी महाविद्यालय, वाळूज यांच्या विद्यार्थ्यांनी मोबाईल ॲप विकसित केला आहे. या ॲपद्वारे संपूर्ण इंद्रधनुष्य २०१६ महोत्सव हा जागतिक पातळीवर पोहचला आहे. यासाठी

विशेषत: फेसबुक पेज, इंन्स्टाग्राम यु-ट्युब, ट्विटर, विद्यापीठ वेबसाईट, पर्यटन विभाग व हवामान यांची ही परिपूर्ण माहिती यात समाविष्ट आहे.

- संपूर्ण महोत्सवात २० विद्यापीठे, ८०० विद्यार्थी, २४ कलाप्रकार, ७३ परीक्षक, विविध ४ रंगमंच याद्वारे इंद्रधनुष्य २०१६ साकार झाला आहे.

- दि. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने शनिवार, दि. २६ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी ठीक १२.१५ वाजता महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत येथे डॉ. एस. एन. बुसी, Member, Customs, Center Excise And Service Tax Affileted Tribunal यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भीमस्मृती या विषयावर व्याख्यान व उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन व दृढ कथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले सदरील कार्यक्रमास मा. प्रोफेसर बी. ए. चोपडे, कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन (६ डिसेंबर):- विद्यापीठाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिना निमित्त दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी विद्यापीठ प्रवेशद्वारे ते मिलिंद महाविद्यालय, मिल कॉर्नर मार्गे भडकलगेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत समता शांती पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत विद्यापीठ विभागतील विद्यार्थी व महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

- तसेच सकाळी १०.३० वा. व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रोफेसर बी.ए. चोपडे, कुलगुरु असून मा. डॉ. सुरेंद्र श्रीरंग धाकतोडे, मुंबई यांचे ''मानवी हक्क व डॉ. बाबासाहेब आंबेडकर'' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

- महानुभाव साहित्यावर वक्तत्व स्पर्धा :- विद्यापीठातर्फे दरवर्षी महानुभाव साहित्यावर वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यात येते. ही स्पर्धा महानुभाव आश्रम, श्रीकृष्ण मंदिर, पैठण रोड, औरंगाबाद येथे आयोजित केली जाते. या स्पर्धेचा विषय महानुभाव साहित्य : काल, आज आणि उद्या हा होता. दरवर्षी ३० डिसेंबर रोजी या ही स्पर्धा घेतली जाते. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम ३१ डिसेंबर रोजी घेतला जातो. संबंध महाराष्ट्रातून महाविद्यालयीन व विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभागी होतात. महाराष्ट्राबाहेरील चौदा विद्यापीठांना सुद्धा या स्पर्धेसाठी परिपत्रक पाठवून निमंत्रित केले जाते.

- पश्चिम विभागीय युवक महोत्सव गणपत विद्यापीठ, गणपत विद्यानद्रर, म्हैसाना, गुजरात येथे दि. ६ जानेवारी ते दि. १० जानेवारी २०१७ या दरम्यान संपन्न झाला. सदरील युवक महोत्सवामध्ये विद्यापीठाचा संघ सहभागी होऊन सुगमगायन भारतीय, मिमिक्री, प्रहसन, मृदमुर्तीकला, व्यंगचित्रकला, स्पॉट फोटोग्राफी या कलाप्रकारामध्ये बक्षीस प्राप्त केले आहे.

- व्याख्यानमाला : - विद्यापीठातर्फे दरवर्षी खालील व्याख्यानमाला विद्यापीठ शैक्षणिक विभाग, विद्यापीठ उपकेंद्र,

उस्मानाबाद व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येतात. १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला, २) महात्मा गांधी व्याख्यानमाला, ३) राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला, ४) डॉ. मोईन शाकीर व्याख्यानमाला, ५) डॉ. जगदीशचंद्र बोस व्याख्यानमाला, ६) डॉ. सी. व्ही. रमण व्याख्यानमाला व ७) स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला.

- कार्यशाळा व शिबिरे : - विद्यापीठातर्फे दरवर्षी खालील कार्यशाळा व शिबिर विद्यापीठ शैक्षणिक विभाग, विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबाद व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येतात. १) नवोदित लेखंकासाठी कार्यशाळा, २) नाट्य प्रशिक्षण शिबिर, ३) पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण शिबिर ४) व्यसनमुक्ती महाविद्यालयीन स्पर्धा, ५) उद्योजकता विकास कार्यशाळा, ६) युवक नेतृत्त्व शिबिर व ७) विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर.

## स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला

डॉ. सी. व्ही. रमन व्याख्यानमाला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला, नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला, वा. ल. कुजकर्णी व्याख्यानमाला, महात्मा गांधी व्याख्यानमाला, राजर्षी शाहु महाराज व्याख्यानमाला, डॉ.जगदिशचंद्र बोस व्याख्यानमाला, नाट्य प्रशिक्षण शिबिर, पर्यावरण संरक्षण शिबिर, व्यसनमुक्ती महाविद्यालयीन स्पर्धा, नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा, सामान्य ज्ञान स्पर्धा

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ देणगी निधी अंतर्गत व्याख्यानमाला व इतर उपक्रम (देणगी निधी अंतर्गत व्याख्यानमाला व इतर उपक्रम अनुदान रु.३१,०००/-)

| अ.क्र. | व्याख्यानमाला | विभाग |
|---|---|---|
| १ | महात्मा जोतिबा फुले व्याख्यानमाला | राज्यशास्त्र |
| २ | माईन शाकीर व्याख्यानमाला | राज्यशास्त्र |
| ३ | डॉ. अनंत बी. लाभशेटवार आणि श्रीमती लता लाभशेटवार व्याख्यानमाला | वाणिज्य |
| ४ | सरदार दलिपसिंग व्याख्यानमाला | लोकप्रशासन |
| ५ | डॉ. एस. एम. जोशी व्याख्यानमाला | हिंदी |
| ६ | श्रीमती काशीबाई ए. गऊळकर व्याख्यानमाला | समाजशास्त्र |
| ७ | स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला | जनसंवाद व वृत्तपत्रविद्या |
| ८ | डॉ. व्ही. व्ही. यार्दी व्याख्यानमाला | इंग्रजी |

### विद्यापीठ समारंभ व कार्यक्रम :-

- सेवागौरव समारंभ : - दरवर्षी विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त होणाऱ्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवागौरव प्रत्येक महिन्यांच्या शेवटच्या तारखेला केला जातो. सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, व पुस्तक देवून मा. कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात येतो.

कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना :

अ) कर्मवीर भाऊराव पाटीलयांच्या संकल्पनेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना विद्यार्थी कल्याण विभागातर्फे राबवली जाते. या योजनेचा फायदा गरीब, होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांना होत आहे. या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात एकूण ६३७ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला. या योजनेअंतर्गत फाईल निमित्ती, गांडुळ खत, फाईल पॅड तयार करणे इ. विविध उपक्रम राबवले जातात.

- **विद्यार्थी वसतिगृहे :**

- विद्यापीठात एकूण पाच विद्यार्थी वसतिगृहे व एक विद्यार्थी विश्रामगृह आहे. या वसतिगृहाकरिता डॉ. नारायण पंडुरे, डॉ. भास्कर साठे, श्री. कुमार व्ही. एस. डॉ. मदन सुर्यवंशी, श्री. संजय शिंदे, डॉ. विलास इप्पर हे वसतिगृह अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. या वर्षी पासून सर्व वसतिगृहात आर. ओ. जलशुध्दीकरण प्रकल्प बसविण्यात आले.

- **विद्यार्थिनी वसतिगृहे :**

- विद्यापीठ प्रांगणात सात विद्यार्थिनी वसतिगृहे व प्रियदर्शिनी अशी विद्यार्थिनी वसतिगृहे आहेत. नवीन आर्थिक दृष्ट्या मागास मुलींचे वसतिगृह नव्याने २०० क्षमतेचे सुरु करण्यात आले. डॉ. सोनाली क्षीरसागर, डॉ. बीना सेंगर, श्रीमती गिरीबाला बोंदले, डॉ. सविता बहिरट, डॉ. सांत्वना मिश्रा, डॉ. प्रतिभा आहिरे या वसतिगृह अधीक्षिका म्हणून कार्यरत आहेत. प्रियदर्शिनी या वसितगृहात शासकीय कोट्यातून ५० मुलींना प्रवेश देण्यात आला होता. दरवर्षी प्रमाणे वसतिगृहदिन साजरा करण्यात आला.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तारदिन २०१ निमित्त भीमगित गायन स्पर्धा दिनांक ०९.०१.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. तसेच दि.१३ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ६.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहामध्ये डॉ. संजय मोहाड व संगीत विभाग विद्यार्थी वृंद प्रस्तुत गीत भीमायन चे आयोजन करण्यात आले होते.

- दि. २५ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय मतदार दिनानिर्मित्त महात्मा फुले सभागृहामध्ये डॉ. एच. ए. गणी यांचे विशेष व्याख्यान संत्र झाले.

- **विद्यापीठ नामविस्तारदिन (१४ जानेवारी) :-** विद्यापीठ नामविस्तारदिन दि. १४.०४.२०१७ रोजी साजरा करण्यात आला. दि. १४ जानेवारी २०१७ रोजी विद्यापीठ नामविस्तार करण्याकरिता ज्या मान्यवरांनी मोलाचे योगदान दिले अशा मान्यवरांचा सत्कार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. गंगाधर गाडे, औरंगाबाद हे होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. गंगाधर गाडे | प्रमुख पाहुणे |
| २ | मा.प्रा. एस. के. जोगदंड | सत्कारमुर्ती |
| ३ | मा. ॲड रमेशभाई खंडागळे | सत्कारमुर्ती |
| ४ | मा. ॲड रतनकुमार पंडागळे | सत्कारमुर्ती |
| ५ | मा. ससो खंडाळकर | सत्कारमुर्ती |
| ६ | मा. श्री. डॉ. अनिल अवचट | सत्कारमुर्ती |
| ७ | मा. श्री. शंकर कांबळे | सत्कारमुर्ती |
| ८ | शहीद गौतम वाघमारे | यांच्या परिवारामधील व्यक्ती |
| ९ | शहीद पोचीराम कांबळे | यांच्या परिवारामधील व्यक्ती |
| १० | शहीद इन्सपेक्टर भुरेवार | यांच्या परिवारामधील व्यक्ती |
| ११ | शहीद जनार्धन मवाडे | यांच्या परिवारामधील व्यक्ती |

- **भारतीय प्रजासत्ताकदिन (२६ जानेवारी) :-** विद्यापीठाच्या वतीने भारतीय प्रजासत्ताकदिन दि. २६.०१.२०१७ रोजी इतिहास वस्तूसंग्रहालयाच्या हिरवळीवर मा. कुलगुरु प्रोफेसर बी.ए. चोपडे हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला.

- दिनांक ३०.०१.२०१७ रोजी हुतात्मादिना निमित्त हुतात्म्यांना सायरन वाजवून मा. कुलगुरु, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी-कर्मचारी व विद्यार्थी यांनी श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.

- हार्टफुलनेस इंस्टिट्युट द्वारा दि. ०१ ते ०३ फ्रेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ठिक ७.३० ते ८.३० या दरम्यान महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत येथे चला, आता जास्त जोमाने ध्यान करुया चे आयोजन करण्यात आले यामध्ये श्री. कमलेश पटेल, ऑनलाईन मास्टर क्लासेस मधून मार्गदर्शन केले.

- पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त दि. ११ फेब्रुवारी २०१७ रोजी महात्मा फुले सभागृहामध्ये सकाळी ११.०० वाजता मा. डॉ. अशोक मोडक, मुंबई यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

- रविवार, दि. १९ फेब्रवारी २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने विद्यापीठ नाट्यगृहात दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पोवाडा गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्यापीठ प्रवेशद्वार ते विद्यापीठ नाट्यगृहापर्यंत श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची मिरवणुक सकाळी ठिक ०८.०० वाजता काढण्यात आली असून विद्यापीठाच्या नाट्यगृहात सकाळी ठीक ११.०० वाजता **मा. प्रोफेसर नरेंद्र मोहन,** दिल्ली यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

- दि. २२ व २३ फेब्रुवारी २०१७ रोजी समन्वयक, इंटरनॅशनल पिस अ‍ॅण्ड गुडविल समिट, रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मेट्रो, औरंगाबाद व विद्यार्थी विकास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यामाने International Summit on Promotion of Peace & Good will in SAARC Nations चे आयोजन सी. एफ. सी. हॉलमध्ये दुपारी ठिक ५.०० वाजता करण्यात आले होते. यामध्ये भारतासह बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, नायजेरिया आदी देशांतील प्रतिनिधी या सहभागी झाले होते.

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त मंगळवार दि. ११ एप्रिल २०१७ ते शुक्रवार दि. १४ एप्रिल २०१७ रोजी पर्यंत खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

| अ. क्र. | दिनांक व वेळ | कार्यक्रम | कार्यक्रमाचे ठिकाण | वक्ते/ व्याख्याते व व्याख्यानाचा विषय |
|---|---|---|---|---|
| १ | दि.११ एप्रिल २०१७ सकाळी ११.०० | महात्मा जोतिबा फुले जयंती | महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत | मा.प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे<br>विषय: फुले, शाहु, आंबेडकर विचार पंरपरा |
| २ | दि. १२ एप्रिल २०१७ सकाळी ११.०० | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विशेष व्याख्यान व पुस्तक प्रकाशन समारंभ | महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत | मा. डॉ.एस.एस.धाकतोडे (मुंबई)<br>मा. श्री. महेश भारती (मुंबई)<br>मा. श्री. अर्जून डांगळे (मुंबई)<br>थॉमस जेफरसन अॅड डॉ. बी. आर आंबेडकर<br>कम्पॅरिटीव्ह स्टडी-पुस्तक प्रशकान व व्याख्यान |
| ३ | दि. १३ एप्रिल २०१७ सायंकाळी ६.०० | गीत भीमायान | विद्यापीठ नाट्यगृह | डॉ. संजय मोहाड व विद्यार्थी वृंद संगीत विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| ४ | दि. १४ एप्रिल २०१७ सकाळी८.३०ते१०.३० | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक | विद्यापीठ प्रवेशद्वार ते नाट्यगृह | ---------- |
| ५ | दि. १४ एप्रिल २०१७ सकाळी११.०० वाजता | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विशेष व्याख्यान | विद्यापीठ नाट्यगृह | मा. प्राचार्य डॉ.व्ही.बी. तायडे<br>विषय: डॉ.बाबासहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि त्यांची सद्यस्थितीतील समर्पकता |
| ६ | १ मे २०१७ सकाळी ८:३० वाजता | महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त | विद्यापीठ नाट्यगृह | कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त उपस्थितांना मार्गदर्शन केले |

**डॉ. सुहास मोराळे**
संचालक
विद्यार्थी विकास

# ग्रामीण विकासात, राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका

प्रस्तावना

भारत हा शेतीप्रधान देश आहे असे म्हटले जाते. साधारणत: ६९ टक्के जनता ही ग्रामीण भागात वास्तव्य करते अणि ६० टक्के रोजगार पुरविण्याची भूमिका शेती व शेतीवर आधारीत व्यवसाय बजावतो. म्हणजेच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास म्हणजेच भारताचा विकास असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. परंतु अशा ग्रामीण विकासाच्या ऐवजी ग्रामीण भकास आणि शहराचा विकास अशीच काही अंशी चित्र आपल्याला पाहयाला मिळते. वाढती लोकसंख्या, शेतीवरील लोकसंखेचा अतिरिक्त भार, जलसिंचनाची अपुरी सोय, विजेचा लपंडाव ना अभाव, शेती मालाच्या वाढत्या किंमती, ग्रामीण भागातून किंवा खेड्यातून मजुरांचे शहराकडे होणारे स्थलांतर, सरकारी धोरणाची उदासिनता, अनियंत्रीत बाजार व्यवस्था, शेतीमालाला योग्य बाजारभाव न मिळणे अशा विविध कारणामुळे शेती व्यवसाय तोट्यात किंवा अडचणीत आला आहे. वाढता कर्जबाजारीपणा व त्यामुळे शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या इ. अनेक समस्या ग्रामीण भागात वाढत आहे, धोरण कर्ज, सरकार, सामाजिक संस्था या वरचेवर अशा समस्यांमुळे हतबल होताना दिसून येत आहेत.

ग्रामीण भागाचा, शेतकऱ्यांचा किंवा शेतीचा विकास करण्यासाठी सरकार विविध माध्यमातून प्रयत्न करत असते काही सामाजिक संस्था अशा धोरणाच्या अंमलबजावणीत भूमिका बजावतात. लोकांच्या सहभागातून ''जलयुक्त'' शिवार सारखे उपक्रम काही प्रमाणात यशस्वी झालेले महाराष्ट्रात पाहवयास मिळाले. ''हुंडा'' ही अत्यंत लाजीरवाणी बाब आजही समाजात पाहण्यास मिळते, मुलींचा जन्म होऊन नये म्हणून गर्भपात केले जातात. आजही गावोगावी उघड्यावर शौचास जातात. आरोग्याच्या समस्या भेडसावत आहेत अज्ञान, अंधश्रद्धा इ. ग्रामीण भागात पाहण्यास मिळतात. परिवार सरकारचे धोरण, प्रयत्न, अयशस्वी होताना दिसतात. अशा सरकारच्या धोरणाच्या विविध उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ''राष्ट्रीय सेवा योजना'' विद्यार्थीच्या सहभागाने काही प्रमाणात यशस्वी होताना दिसते. त्यामुळे ग्रामीण विकासात ''राष्ट्रीय सेवा योजनेची'' भूमिका समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

''राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची पार्श्वभूमी

महाविद्यालयीन विशेष म्हणजे ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास घडवून आणने या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली.

स्वावलंबन, नेतृत्वगुण, चारित्र्य संवर्धन व सामाजिक बांधीलकी या गुणमूल्यांचा समावेश शिक्षण प्रणालीत समाविष्ट करण्यासाठी महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे २४ सप्टेंबर १९६९ पासून महाविद्यालयीन विद्यार्थीसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या ''युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयांतर्गत'' राबविण्यात येते.

१९६९ मध्ये प्रायोजित तत्वावर देशातील काही विद्यापीठात हा उपक्रम राबविण्यात आला यामध्ये भारतात प्रथम ३७ विद्यापीठात एकूण ४००० विद्यार्थ्यासांठी ही योजना सुरु करण्यात आली व नंतर तिचा विस्तार होत गेला सध्या देशातील १८० विद्यापीठातील ९५०० महाविद्यालयातील जवळपास २६ लाख विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या २५ विद्यापीठातून ३४९,९०० विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उच्च शिक्षण होत असताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य करतात. यामध्ये मराठवाड्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठासी संलग्नीत असलेल्या एकूण २९५ महाविद्यालयातून ३७० कार्यक्रम अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली एकुण ३६००० विद्यार्थी सहभागी झालेले आहेत तर नांदेड येथील स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ अंतगत चार जिल्ह्यातील १८५०० स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी झालेल आहेत.

या स्वयंसेवकाच्या माध्यमातून किंवा सहभागातून सामाजिक बांधिलकी निर्माण करुन समाजामध्ये विशेषत: ग्रामीण भागात शांतता-सलोखा निर्माण करण्याचे, देशाचे ऐक्य-अखंडता टिकवून ठेवण्याचे, देशाचे, ग्रामीण उभारणीचे विधायक व रचानात्मक कार्य करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य अर्थात ''माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी'' या निस्वार्थी भावनेवर आधारीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बिलामध्ये एकूण आठ आरे हे गतीचे घोतक आहे. जे सतत कार्यकरत राहण्याची प्रेरणा देते.

२४ योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात आपल्या महाविद्यालयाच्या परिसर, विद्यापीठाच्या परिसरात विविध उपक्रमात या स्वयंसेवकाचा सक्रीय सहभाग असतो. विविध सांस्कृतीक कार्यक्रम राष्ट्रपुरुषांची जयंती पुण्यतीथी असे विविध उपक्रम घेतले जातात. ग्रामीण भागात जलसंधारण, वृक्षारोपण स्वच्छता अभियान हागणदारी मुक्त गाव, शोषखड्डे रस्ते निर्मिती, शेततळे, जलव्यवस्थापन, जलपुनर्भरण, पर्यावरण संवर्धन, समय भारत अभियान, दारुबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, उर्जा संवर्धन, लेक वाचवा लेक जगवा, लेक शिकवा इ. सामाजिक उपक्रम घेतले जातात. रस्ता सुरक्षा अभियान, आरोग्य विषयक उपक्रम, एडस् नियंत्रण व प्रबोधन इ. संवेदनशील उपक्रमही प्रबोधणातून मांडले जातात शेतीविकास विषयक ग्रामीण उद्योजकता विकास, शेतीमाल प्रक्रिया उद्योग मार्गदर्शक, रक्त दान, बाल संगोपण, बचत गट, साजरता अभियान, मतदार जनजागृती अभियाण कचरा व्यवस्थापन इ. उपक्रम ग्रामीण भागात जाऊन शेतकऱ्यांसोबत राहून सहवासाने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, उपक्रम ग्रामीण भागातील निवासी शिबिरा मार्फत राबविले जातात.

शेतकरी आत्महत्या का करतात, शेतकऱ्यांच्या समस्या काय, शेती व्यवसायासमोरील कोणती आव्हाने आहेत कर्जबाजारीपणा व तो कमी करण्यासाठी उपाय योजना इ. संवेदनशिल व आणी महत्त्वाचा विषयावर सुसंवाद आयोजित केला जातो. प्रत्येक महाविद्यालयातील प्रत्येक एकच जन आणि हे विविध उपक्रम कार्यक्रम अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविले जातात.

त्याच प्रमाणे विद्यापीठ पातळीवर, कॉलेज पातळीवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे दिवस व सप्ताह साजरी केली जातात. राजपाळ किंवा शासनाच्या वतीने प्रतेक जिल्ह्यातील ३० विद्यार्थ्यांना आपली व्यवस्थापन चे प्रशिक्षण दिले जाते. विशेष म्हणजे जेंव्हा गाववार, जिल्हावार अथवा एखाद्या परिवारावर नैसर्गिक संकट आपत्ती उदभवते उदा. पूर, भूकंप, वादळ, अतीवृष्टी, दुष्काळ, बॉम्बस्फोट किंवा कोणत्याही संकटात राष्ट्रीय स्वयंसेवक समाजाच्या मदतीसाठी धाऊन जातात. या वर्षीच (२०१६) दिपावलीच्या आधल्या दिवशी औरंगाबाद येथे फटाक्याच्या दुकानाला आग लागून प्रचंड नुकसान झाले. या भयानक संकटात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ५० स्वयंसेवकाने संपूर्ण बचाव कार्यासाठी परिश्रम केले. कर्णपूरा औरंगाबाद येथे दसरा महोत्सवात

स्वच्छता अभियान राबविले, एड्स जन जागृती, रस्ता सुरक्षा, लेक वाचवा लेक जगवा या प्रमाणे अनेक उपक्रम राबविले महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्या भयंकर अशा भूकंपात या विद्यार्थ्यांनी मोलाची कामगीरी बजावली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे ७०० एकर परिसरात विस्तारलेले आहे. या भागात चोहोबाजूंनी डोंगराची कडा आहे डोंगरातून वाहून येणारे पाणी आडवून ठेवण्यासाठी छोटे डॅम - धरण बांधण्यात आले, विविध ठिकाण पाणी आडविण्याची व्यवस्था केली. येत्या काळात २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ परिसरातील संपूर्ण ५० जुण्या ऐतिहासिक विहीरीचे पुर्नजिवन, पुर्नभरण करण्यात येणार आहे. जागोजागी पाणी आडविण्यात येणार आहे. विद्यापीठ व पाण्याबाबतीत आता निर्मळ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे लोकांच्या सहभागातून, विद्यार्थ्यांच्या सहभागातून संपुर्ण विद्यापीठ परिसर जलमय करण्यात संकल्प विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्राध्यापक बी. ए. चोपडे यांनी केला त्यांच्या या आव्हाणाला साथ देण्यासाठी येत्या काळात ''जलव्यवस्थापन अंतर्गत'' जलवृक्ष हा उपक्रम उभारण्यात येईल ३१ मार्च २०१७ रोजी. प्राचार्य कल्याण लहाने यांच्या उपस्थितीत डॉ. सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यक्रम अधिकार्य डॉ.विलास दूसार यांच्या आयोजनाने ''जलवृक्ष'' म्हणून अर्थात विद्यापीठ जलदुत नियुक्त करण्यात येतील प्रत्येक प्राध्यापक, कर्मचारी, उत्सुक असलेले कोणतेही विद्यार्थी अथवा नागरीक या अभियाणात सहभागी होऊ शकतात. असे अव्हान या कार्यक्रमात करण्यात आले विद्यापीठ परिसरातील ''जलतरण कुंभ'' लवकरच या वर्षी या सुरु करण्यात येईल. विद्यापीठातील आडविलेले पाणी संवर्धन केलेले 'पाणी' या जलतरण कुंभ वापरले जाईल ''जलदुत' अर्थात विद्यापीठातील रा.से.यो याची जबाबदारी स्विकारुन त्याचा विसार करेल या जलतरण कुभाच्या उपयोग समाजीक जनता किंवा पोहायला शिकणारे विद्यार्थी अतिशय कमी शुल्क भरुण करुन शकतील. यातून मिळणारे उत्पन्न हे विद्यापीठातील परिसरातील संपूर्ण विहीरीचे खोदकाम, पुर्नजिवन, पुर्नभरन तसेच प्रत्येक ठिकाणी पाणी आडवून ठेवण्यासाठी केला जाईल. येत्या काळात २०१७-१८ या वर्षात विद्यापीठातील संपूर्ण नाला/नदी विकास केला जाईल, जागोजागी पाणी आडविले जाईल. तसेच या नाल्यांच्या बाजूला जनतेच्या सहभागातून उद्यान विकसित केले जाईल. त्याच प्रमाणे सकाळी व्यायामासाठी या उद्यानाच्या सभोवती केला जाईल या प्रमाणे प्रथम विद्यापीठ पाण्याबाबतीत संपूर्ण आत्मनिर्भर करणे, हे अडीस्ट ''जलदुत'' च्या माध्यमातून केले जाईल.

वरिल प्रमाणे गावपातळी, तालुका, जिल्हा, शहर किंवा विद्यापीठ परिसर इ. भागाचा विकास करण्यासाठी रा.से.यो.चे. स्वयंसेवक प्रयत्न करत राहतात. आणि या दोन वर्षाच्या श्रमशिक्षणातून, प्रशिक्षणातून तयार होणारा विद्यार्थी हा आपल्या नोकरीची, व्यवसायाच्या माध्यामतून देशाचा विशेषत: ग्रामीण भागाचा तथापी गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटीबद्ध असेल. आणि देशाच्या ग्रामीण भागाच्या विभागात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वाची आहे.

**डॉ. सुहास मोराळे**
संचालक,
विद्यार्थी विकास

# राष्ट्रीय युवक महोत्सव

खुप मोठ्या उत्साहात पार पडला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या शहरात अनेक गोष्टीमुळे, महालक्ष्मीच मंदिर, मल्लांची भूमी आणि अनेक नावांनी या शहराची ओळख ही संपूर्ण भारतभर आहे. ऐतिहासिक भूमी म्हणून ओळख असणाऱ्या शहरात. आम्ही इतिहास घडविला. कारण अनेक वर्षापासून राष्ट्रीय पातळीवर आपल्या विद्यापीठाच्या पदरी कायम अंधारच होता. पण प्रा. अनिलकुमारे साळवे सरांच्या दिग्दर्शन असलेली 'कब होगी सुबह' ने पारितोषिक पटकावून जणु अंधाराचे पोट फाडून यशाची नवी पहाटच उगवली.

अनेक वर्षाची मनातील भावना पुर्ण झाली हा एक मैलाचा दगडच ठरला. आज ही परत-परत ऐकावासा वाटतो कानाला बक्षीस वितरण होत असतानाचा माईक वरील आवाज 'थेटर चॅम्पीयनशीप गोज टु डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि हे नाव कानावर पडताच बेभानपणे रंगमंचाकडे पळत सुटणारे आम्ही, आणि इतर आनंदाच्या भरात आम्ही आमचे मार्गदर्शक प्रा. अनिलकुमार साळवे यांना मोठ्या उत्साहात खांद्यावर घेऊन विजयी घोषणा देऊ लागलो. साळवे सरांचा विजय असो.... त्यावेळी माझ्या प्रत्येकाच्या डोळ्याचा कडा पाणवल्या होत्या.

कारण तो आनंदाचा क्षण गेल्या कित्येक वर्षापासून आपल्या वाट्याला आलाच नव्हता आणि तो इतिहास निर्माण केल्याचा आनंद प्रत्येकाचा चेहऱ्यावर दिसत होता. कोणताही इतिहास एक दिवसात निर्माण होत नाही त्यासाठी अनेक रातीचा दिवसाचा संघर्ष असतो. या प्रवासाची सुरूवात झाली ती केंद्रीय अंकुर महोत्सवापासून आम्ही आमच्या देवगिरी संघाने सर्वोत्कृष्ट संघ लेखाचा मान मिळावा या हेतूने प्रत्येकाला पोट धरून हसवून वास्तवाची जाणीव करून देत पारितोषिक वर आपले नाव कोरले. महोत्सवात आमच्या पाठीशी सतत आधार असणारे सतीशभाऊ चव्हाण यांचे ही आभार मानावेसे वाटतात आणि त्यानंतर विद्यापीठातच आयोजन असणाऱ्या इंद्रधनुष्य महोत्सवात आपला संघ उतरणार होता. प्रा अनिलकुमार सरांनी आपल्या घरी आपणाला विजय मिळवायचाच या हेतूनेच दिवस-रात्र तयारी करून घेतली. दांडगे सरांनी पण खुप धावपळ केली आणि म्हणजेच आपल्या विद्यापीठास अनेक वर्षानंतर उपविजेता होण्याचा मान मिळाला आणि मग प्रवास सुरू झाला तो (Westzone festival ) चा आणि तेथेही प्रेक्षकांनी खुप ठोक्यावर घेतले आणि भेटायला येणारा प्रत्येकाजण म्हनायचा... खुप अभिनंदन पण ज्यांनी कुणी लेखन केले या लेखकास Hates of त्यावेळी आम्हाला सरांचा खुप अभिमान वाटला आणि आम्हालाही सलाम करावासा वाटला आणि मग काय गुजरात मध्येही विजयी झेंडा रोवून आपल्या विद्यापीठाची इतिहासात प्रथम येण्याचा मान पटकावून औरंगाबादला रवाना झालो. खुप कौतुक झाले वर्तमानपत्रात खुप प्रसिध्द मिळाली. पण सरांनी आम्हाला बजावले एवठ्याशा यशाने हुरळुन जाऊ नका, पाय जमिनीवर ठेवा आणि आनंद साजराच करायचा असेल तर नॅशनल ला बाजी मारा आणि मग खरा आनंद साजरा करा.

आणि मग सरांच्या मार्गदर्शनाखाली देवगिरी महाविद्यालयातच सुरूवात झाली.राष्ट्रीय युवक महोत्सवाची, तालमीची कारण देवगिरी महाविद्यालयातील ४ विद्यार्थीं असल्यामुळे आमची सोय लक्षात घेऊन विद्यार्थी कल्याण विभागाने तशी सोय उपलब्ध केली होती.

आणि मग आम्ही निघालो पुर्ण तयारीनिशी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरला सकाळी विद्यापीठ परिसरात प्रवेश करताच, मोराचा आवाज खुप प्रसन्न वाटले. मनाला जणु आमच्या स्वागत करण्यात मोरांना ही आनंद झाला असावा आम्ही दाखल झाल्यानंतर अनेक संघ, गुजरात, तामिळनाडू, पंजाब, झारखंड, आसाम, राजस्थान, इथे बोलणारांची प्रत्येकाची भाषा, पहेराव वेगळा जणु कोल्हापूर शहरात संपुर्ण भारत दर्शन झाल्याच समाधान मनाला वाटले.

महाराष्ट्रीय महोत्सवात सादर झालेले सर्व कलाप्रकारातून खुप शिकायला मिळाले एकांकिका Skit प्रकारातील भाषा कोळी होती. पण भाव एकच माणसाच जगण आणि त्यांचे प्रश्न प्रेक्षकांपर्यंत पोहचवावा.

कोल्हापूर शहर लक्षात राहीत तेथील तांबड्या आणि पांढऱ्या संस्थामुळे आणि तेवढ्याच प्रेमळपणे आम्ही जेवु घाणारी सर्व केर्टसची मुले-मुली मग काय दिवसा मागून दिवस जावे तसा दिवस उजडला बक्षिस वितरण समारंभाचा आता धडधड वाढत होती. मंडप गच्च भरलेला आता पुढे काय होणार आणि अचानक आपल्या संघाला अनेक कलाप्रकारात पारितोषीक पटकावून नवा इतिहास घडविला होता. आमच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत होता. कारण तसेच होते. नाचुन नाचून दमल्यावर कुणालाच भूक लागली नव्हती कारण का? तर मला प्रा. साळवे सरांचे वाक्य खुप आवडले ते म्हणाले पोट भरले नाही तरी चालेल पण मन भरले पाहिजे. आणि आमच्या प्रत्येक कलावंतांचे त्या ऐतिहासिक विजयानेच भरले होते.

आता मात्र प्रवास सुरू झाला होता. आपल्या शहराकडे येण्याचा हा विजय सोपा नव्हता. खुप अवघड प्रवास होता. सर्वांच्या शुभेच्छा आणि सहकार्यामुळे हा विजय मिळवला आला. प्रा गजानन दांडगे वारंवार सूचना देत असत प्रा. सुनिल टाक यांनी खुप काळजी घेतली. आम्हा कलावंताची बुजाडे मॅडम विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख डॉ. सुहास मोराळे के वारंवार आमची चौकशी करत असायचे आणि ज्यांच्या मार्गदर्शनाखाली, दिग्दर्शनामुळे हा इतिहास घडविता आला. आंतरराष्ट्रीय पातळीवर आमची निवड झाली असे आमच्या सर्व विद्यार्थी कलावंतांचे आवडते प्रा. अनिलकुमार साळवे सर तुम्ही कायम आमच्या स्मरणात राहाल.

आणि हा प्रवास भेटलेल्या कलावंतांची अनेक भाषा, संस्कृतीने सजलेला हा युवा महोत्सव माझे सर्व सहकारी कलावंत, सदाभाई, अनिल राठोड, अनिल बडे, अभिजीत वाघमारे, प्रसाद खडके, प्रसाद वाघमारे, अस्मिता भारती तुम्ही सर्व कायम आठवणीत राहील. आयुष्यभर एक कलावंत म्हणून स्मरणात राहणार हा ३२ वा राष्ट्रीय युवक महोत्सव.

प्रकाश दादाराव बांगर
देवगिरी महाविद्यालय,
औरंगाबाद

# शांतता व सदभावना निर्मित धर्माची भूमिका

धर्म = अस्तिक्य + चारित्र्य

भारत हा प्राचीन परंपराचा देश आहे. प्राचीन संस्कृतीचा देश आहे. प्राचीन संस्कृतीचा देश आहे. तसाच हा बहुविध धर्मांचाही देश आहे. त्या सर्वच धर्मांचा आदर राखला गेला पाहिजे. सर्व धर्मांची प्रतिष्ठा मानली पाहिजे. ह्या देशतील सर्व धर्मांचा आदर राखला पाहिजे तसेच सर्व धर्माचा सारख्यांच भावनेतून सन्मान करायला हवा.

या विज्ञानयुगात धर्मासंबंधी विचार करणे प्रतिगामीपणाचे लक्षण होय असे अनेकांना वाटेल. धर्म म्हणजे अंधश्रध्दा धर्म म्हणजे पलायनवाद, धर्म म्हणजे अफूभी गोळी, धर्म म्हणजे संकुचित सांप्रदायिकता अशा शब्दांत आधनिक वैज्ञानिक व विज्ञानवादी व बुध्दिवादी विचारवंताकडून केला गेलेला धर्माचा उपहासही आपण अनेकदा ऐकतो. आजच्या विज्ञानालात धर्माला काही स्थान नाही, भौतिक विचारसरणीच्या लोकांचा सूर आहे. अशा परिरस्थितीत धर्माचा खरोखरच एवढ्या आस्थेवाईकपणे विचार करण्याची काय गरज आहे अशी शंका कोणाचाही मनात निर्माण होणे स्वाभाविकच टरेल. परंतु एकीकडे धर्मबद्दल असे प्रतिकूल अमिप्राय जरी प्रगट योत असले तरी विज्ञानाने केलेला संहार भौतिक भैतिक समृधीचा उच्चांक गाठलेल्या देशांतील लोकांच्याही मनात अशांतता, मानवी मनातील प्राश्वी प्रकृतींचे प्रदर्शन, जीवनात निर्माण झालेली भयानक पोकळी व असुरक्षितता लक्षात घेता आता धर्माचा आधार घेतल्याशिवाय तरणोपाय नाही,

''धर्मी विश्वस्थ जगत: प्रतिष्ठा । धर्मे सर्व प्रतिष्ठातंम् ।''

'' धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजा: ।
य: स्याध्दाष्टणसंयुका: स धर्म इनि निश्चय:। '

म्हणजेच- धारणा करतो तो धर्म धर्मनेच प्रज्ञा प्रजा बहुहा होते. म्हणून जो प्रजेचे धारण करतो. रक्षण करतो धर्म- अशी महर्षी व्यासांनी महाभारतात धर्माची व्याख्या केली आहे.

धर्मामुळे जगाला स्वैर्य व प्रतिष्ठा प्राप्त होते असे धर्माचे वर्णन आहे. एकूण समाजधारणा हे धर्माचे मुख्य तत्त्व आहे. धर्म म्हणजे कोरडेपना किंवा केवळ कोरडे ज्ञान नसलेला शुरधावचरणीही एक वेळ मोक्षाचा अधिकारी होऊ शकेल: परंतु आचारभ्रष्ट पंडिताला सोबतच प्राचीन ऋषींनी आचारधर्माचाही पुरस्कार केला आहे. वाज्ञवल्कव ऋषींनी पुढील नवलक्षण धर्म सांगितला आहे. याज्ञवल्कय ऋषींनी पुढील नवलक्षण धर्म सांगितला आहे.

'अहिंसा सत्यमस्तेयं सौचमिन्द्रियनिग्रह:।
दानं दमो दवा क्षान्ति : सवैषां धर्मसाधनम् ।। '

अहिंसा, सत्य, अस्तेय, चोरी ना करणे, अंतर्षाहय शुचिता, इंद्रियनिग्रह, दाल, निषिरध विषयाचे चिंतन न करणे, दीनदुबळ्यांवर दया करणे, पिताचा क्षोभ न होणे देणे ही धर्माची प्रमुख साहाने आहेत

शांतता व सहभावना निर्मितीत धर्माची भूमिका-

प्राचीन काळी धर्म हाच जिवनाचा आधार होता, सारे जीवन हे धर्माने व्यापून टाकले होतो, लोकांची देवाधर्मावर श्रध्दा होती व धर्मनियमांना अनुसरून लोग आवरणही करीत. त्यामुळे धर्म हा जीवनाचा प्राणाच होता असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. मध्यंतरी विज्ञानाने मानवाला भौतिक सुखांची अद्भूतपूर्व अशी साहित्य संपदा उपलब्ध करून दिली.

त्यामुळे मानवाला भौतिक सुखांची अद्‌भुतपूर्व उपभोगाची सवय लागली. उपभोगतृत्तीची साहाने जसजशी वाढत गेली सततशी त्याची तृणाही भडंकतच गेली, अनावर झाली परंतु इतके उपभोग फेऊनही 'त्याला समाधान नाहीच विज्ञानाने माणसाच्या बाह्य जीवनामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणला, सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुखसोयींनी त्याचे जीवन समृध्द केले. परंतु त्याचे अंतरंग, तयाचे मन? ते मात्र अजूनही असंस्कृत व रानयी माणसासारखे पाश्वी विकारपासनांनी शष्शबलेले आहे.

पूर्वी मनुष्याला देवाची भीती होती. त्या भीतीमुळे त्याच्या अनावारी हातीला बराच आळा बसला. परंतु आज देव-दानवा नरे निर्मिले, ही आमची मूमिका मग देवाची भीती वाटेल कोढून? धार्मिक व अआध्यात्मिक नीतिमूल्यांचा आज ऱ्हास झाला आहे. माणसाच्या जीवनातून श्रध्दा, निष्ठा, प्रेम, जिव्हाळा, मानुसकी या गुणांचा लोप झाला आहे. जे वैयक्तिक जीवनात तेच सामाजिक जीवनात.

विज्ञानाने निर्माण केलेल्या महाविनाशक अस्त्रांमुळे राष्ट्रांचे सामर्थ्य विलक्षण वाढले आहे, पण ते पाश्वी, आत्मिक नव्हे. निरराळ्या राजसत्ता आज क्रूर व हिंस्त्र बनल्या आहेत. आपल्या राक्षसी महत्वाकांक्षा व सतापीपासा यांच्या पायी त्या समस्त मानवतातींचा विध्वंस्त करण्यासाठी मागेपुढे पाहणार नाहीत. असे दिसून येते. माणसाचा स्वत: वर ताषा राहिला नाही. त्याच्या बुध्दीवर त्याच्या नैतिकतेचे नियंत्रण राहिले नाही. आपल्या बुध्दीच्या निमाखात तो धुंद होऊन गेला, पण त्यानेच निर्माण केलेला हा अस्मासूर आज त्याचाच ग्रास्त घेण्यास सजला आहे.

एकूण मानवजाती जी भयाण अवकळा आली आहे. त्यामुळे मोठमोठ्या विचारवंतांची व बुध्दिमंतांची मती कुंढीत झाली आहे. सामान्य माणूस हा भवभीत व असुरक्षित झाला आहे. यंत्रयुगात निमार्ण झालेल्या मानवी जीवनातील अपरिहार्य यांत्रिकतेला तो विटून गेला आहे.

विनाशाच्या गर्तेकडे वेगाने वाटचाल करीत असलेल्या या मानवजातीची मुकतता कोण करणार? कोणत्या शक्तीमध्ये असे सामर्थ्य आहे याचा आधुनिक शास्त्रज्ञ व तत्तज्ञ शोध घेऊ लागले एक अशी शक्ती आहे याची ज्यांना जाणीव झाली. माणसाचे भौतिक जीवन हे परिपूर्ण जीवन नव्हे. त्यापेक्षाही श्रेष्ठ असलेल्या आध्यात्मिक जीवनाची जोड जोपर्यंत त्याच्या भौतिक जीवनाला मिळत नाही, आपल्या आत्मिक शक्तींचा विकास करून त्यांचा सहाय्याने जोपर्यंत तो आपल्या इच्छा, वासना नियंत्रित करू शकत नाही सोपर्यंत तो सुखी होऊ शकत नाही याची जाणीव अनेकांना आज झाली आहे. केवळ विज्ञानाच्या व भौतिक प्रगतीच्या मागे न लागता आपला आध्यात्मिक व नैतिक विकास करण्याचे ध्येय त्याने समोर ठेवले पाहिजे असे ते म्हणून लागले आहेत.

आज जगापूढे अनेकविध समस्या उभ्या आहेत, व त्या कशा सोडवाव्या यासंबंधी मोठमोठे तत्वज्ञ व विचारवंत यांची मर्तो गुंग होऊन गेली. देशादेशांतील राजकीय समस्या सोडविण्याच्या बाबतीत 'युनो' सारखी आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची संस्थाही निष्प्रभ ठरत आहे. मग या विराट राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक समस्या सुरूतील कशा? यासाठी आध्यात्मिक पातळीवर विचार करणे सर्व क्षेत्रांतील समस्या सोडण्याचा एकमेव मार्ग आहे.

धर्म - शांतता - सदभावना

धर्मापेक्षा मानवता नीतीमत्तेचा आधार असतो - नीमीमत्ता ही मानवी जीवनास आवश्यक असावी हे सर्वसंमत आहे. परंतु त्यासाठी धर्माचा आधार असू नये. मानवतेच्या आधारे नीतीमत्ता विकासित झाली पाहिजे. म्हणजे सदभावना निमार्ण होऊन शांतता नांदेल.

धर्माच्या नानाखाली भेदभाव नको - सर्व धर्मांच्या नागरिकांना समान वागणूक मिळाली पाहिजे. धर्माच्या नाववाखाली भेदभाव करू नये. सर्व धर्म सारख्याच प्रतिष्ठेचे असतात हे विशेषत्वाने रूजविणे आवश्यक आहे.

मानव कल्याणाचा धर्माशी संदर्भ जोडू नये - मानवकल्याण धर्माशी न जोडता नैतिकतेशी जोडायला पाहिजे. नैविकते मधून मानवाचे कल्याण साधण्याचा मार्ग जातो. यातूनच सदभावनेचा विकास घडून येत असतो.

विज्ञानाला आलेले आपयश, भौतिक संस्कृतीला लागलेली कटू फळे, युद्धाच्या भीषण सावल्या, अष्पस्त्रस्फोटामुळे मानवी क्षणभंगुरत्व व मानवी बुध्दी आणि शक्तीचा मर्यादा लक्षात आल्यामुळे बोरिस प्लॅस्टनसारख्या प्रतिभावंत लेखकालाही आध्यात्मिक दृष्टीकोणाच्या आवश्यकतेची जाणीव तीव्रतेने झाली. वस्तु: प्लॅस्टरनाक हा धर्म न मानणारा रशिया देशाचा नागरिक परंतु यांत्रिकतेच्या व भौतिकतेच्या आहारी गेलेल्या साम्यवादी व सत्ताधाऱ्यांच्या हुकूमशाहीला व दडपशाहीला उबलेल्या प्लॅस्टरनाकने आपल्या डॉ. झिवॅगो, या नोबेल पारितोषिक मिळलेल्या कादंबरीत जर या भयग्रस्त परिस्थितीत माणसाला सुखासमाधानाने जगायचे असेल, शांती हवी असेल तर, भौतिकतेच्या मागे न धावता, अंतर्मूख होऊन आत्मतत्वाचा शोध घेणे व मार्ग होय, असे स्पष्ट उदगार काढले आहेत.

या निरनिराळ्या पाश्चात्य विचारवंतांची उदाहरणे देण्याचा उद्देश हाच की, आज किंकर्तव्यमूढ झालेल्या पाश्चात्यांनाही धर्माची माहती पटली आहे. निराशेच्या अहंकारातून धर्मच प्रकाश दाखवू शकेल अशी आशा त्यांच्याही मनात निर्माण झाली आहे. यातून शेवटी हाच निष्कर्ष निहातो की, जीवनात धर्माचे स्थान अत्यंत महत्वाचे अदिष्ठान असेल पाहिजे. 'परंतु तेथे भगवंतांचे अधिष्ठान पाहिजे' हे रामदासांचे म्हणणे आजही तितकेच खरे आहे.

धर्माचा जोड दिली तस्व शांतता आणि सहभावना यांची निर्मिती करता येईल म्हणून शांतता व सद्भावना निर्मितीत धर्म अत्यंत महत्वाची भुमिका वजावतांना आपल्याला दिसून येते. या माध्यमातूनच सर्वधर्म समभाव किंवा धर्मनिरपेक्षा या मूल्यांद्वारे धर्म आपली महत्त्वाची भूमिका बजावत असतो.

'यतो भ्युदय नि:श्रेयससिध्दि: स धर्म:'

## International Pease & Goodwill Summit

## 2017

नावः कु. गायकवाड अंजली दत्तात्रय
वर्ग: एम.फिल. नियमित (द्वितीय वर्ष)
शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

संपर्क: ८६००७०८६७३
मेल आयडी: ganjli448@gmail.com

# इंद्रधनुष्य महोत्सवातील आठवण

प्रा अनिल कुमार साळवे लिखित प्रहसन, ''कब होगी सुबह'' हा एक विनोदी कलाप्रकार भारतात मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आहे. या कला प्रकारात सहभागी होण्याची संधी मला मिळाली हा कलाकार प्रथमच आम्ही तुळजापूर येथे झालेल्या केंद्रीय युवक महोत्सवात सादर केला, तेथे त्याला प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला व आम्ही द्वितीय पारितोषीक पटकावले त्यानंतर औरंगाबाद येथे झालेल्या इंद्रधनुष्य महोत्सवातही आम्ही तृतीय पारितोषीक पटकावले सरांनी व आम्ही सर्व सहभागी कलाकारांनी या कला प्रकारावर अधिक मेहनत घेतली, गुजरात येथे होणाऱ्या झोनल युवक महोत्सवात प्रथम स्थान मिळवण्यात पात्र ठरलो, यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नाव उंचावले गेले. या मुळे आमच्या संघाला कोल्हापूर होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली या ठिकाणी देशभरातील ७७ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते National साठी Selection झाले पण मनामध्ये थोडी भीती होती कारण येथे खुप Tough competition होती परंतु या सर्वांवर मात करून आम्ही तेथे ही यश मिळवण्यात समर्थ ठरलो.

ही सुवर्ण संधी मला प्रा अनिलकुमार साळवे सर, प्रा टाक सर, प्रा दांडगे सर, भुजाडे मॅडम व माझे सर्व सहकारी मित्रांच्या मार्गदर्शनामुळे मिळाली. त्याच बरोबर देवगिरी महाविद्यालय व विद्यापीठीने आम्हाला प्रोत्साहन दिले व आमचे कौतुकही केले. या संपुर्ण प्रवासात आम्हाला खुप काही शिकायला मिळाले. माझ्या जीवनातील हे सर्व क्षणांसाठी मी माझ्या प्राध्यापकांना आणि सहकारी मित्रांना मनापासून धन्यवाद करते.

Teacher plant the seed for tomorrow, there is no substitute for a great teacher they enlight the path of success for us.

So my special thanks to my amazing "Salve sir" giving me such a great opportunity.

Thanks a Lot......

**अस्मिता संजय भारती**
**(नाट्यशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद)**

# मराठी भाषा

**माझ्या मातीचे गायन, तुझ्या आकाश शृतीनी जरा कानोसा देऊन, कधी ऐकशील कारे !**
**माझी धुळीतील चित्रे, तुझ्या प्रकाश नेत्रांनी, जास पापणी खुलुन कधी पाहशील का रे !**
**माझ्या जहाजाचे पंख, मध्यरात्री माखले, तुझ्या किनाऱ्या दिवा, कधी लावशील कारे !**
**माझा रांगदा अंधार मेघामेघात साचला, तुझ्या उषेच्या कानी कधी टिपशील कारे !**

जन्मभूमी हे प्रत्येकाला निसर्गानेच बहाल केलेले वैभव आहे. अगदी तसेच मातृभाषा हे आपले वैभवच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी आहे. मराठी भाषा लहानपणापासून शिकल्यामुळे आपले विचार व्यक्त करणे सोपे जाते. मराठी ही रसाळ आणि सोपी भाषा आहे. मातृभाषा ही ज्ञानभाषा झाली तर शिक्षण सुलभ होईल. मराठी भाषा लवचिक आहे थोड्या थोड्या फरकाने शब्दाचे अर्थ बदलतात. एका अर्थाचे अनेक शब्द असणे किंवा एकाच शब्दाचे अनेक अर्थ असणे हे चांगल्या आणि समृध्दतेचे लक्षण आहे.

२७ फेब्रुवारी ला मराठी भाषा दिन साजरा करण्यात येतो. एखादा दिवस साजरा करणे खूप सोपं झाल आहे. परंतु आपण या दिनानिमित्त खरोखर आपली मातृभाषा टिकावी म्हणून काही प्रयत्न करतोय का त्याचबरोबरीने आपली भाषा समृध्द करायची तिचा वापर, प्रसार करायचा आणि तिचे चिरतत्व अबाधित राखायचे हे सुद्धा मोठे आव्हान आहे. आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. तरीही इंग्रजी भाषेने आपल्या देशात भक्कम पाय रोवले आहेत. आज अनेक पालक मुलांना इंग्रजी शाळेत घालतात. याचा अर्थ असा नाही आपण परकीय भाषा शिकू नये, परकीय भाषा या जरुर शिकवाव्यात त्यांचा आदर करावा. त्याचबरोबर आपल्या मातृभाषेकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यावी. अलिकडच्या काळामध्ये समाजातील तरुणांना इंग्रजी भाषेचे जास्त आकर्षण वाटत आहे. कारण त्यांचं महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण सर्व इंग्रजीतून होत असतं पदव्या मिळवून तरुण मंडळी परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. उच्च शिक्षणाकरिता, नोकरीसाठी परदेशात गेलात तरी हरकत नाही, पण परभाषा जरी अवगत झाली आणि तरी मराठी भाषेला विसरु नका. आई समोर असताना आईचे महत्त्व जाणवते का? जेव्हा आपण परप्रांतात काही काळासाठी जातो व सतत परप्रांती, अनोळखी भाषा आपल्या कानावर पडते तेव्हा आपण मातृभाषा ऐकण्यासाठी कासावीस होतो. चुकुन आपली मातृभाषा बोलणारी अनोळखी व्यक्ती आपल्याला दिसते तरी ती माणसे अनोळखी असूनसुध्दा आपलीशी वाटतात. प्रत्येक मराठी माणसाला मराठी भाषा लिहिता-वाचता आली पाहिजे. आपल्या मराठी भाषेमध्ये सुध्दा अनेक लेखन झाले आहे. ललित, विज्ञान, शास्त्र साहित्यावर खुप लेखन झाले आहे.

आपण आपली मातृभाषा समृध्द करण्याठी तिचा वापर-प्रसार करण्यासाठी आपण आपल्या बोलण्यामध्ये दररोज शक्य तितक्या मराठी शब्दांचा वापर करावा. आपल्या दैनंदिन व्यवहारात, समाजात शक्य तितक्या मराठी शब्दांचा उच्चचार करुन बोलावे. लग्न, वाढदिवस, शुभकार्याला व इतरांना भेटे वस्तु देण्याची प्रथा चांगलीच रुचली असून याकरिता शक्यतो

मराठी/पुस्तक/ काव्यसंग्रह भेट म्हणून देण्यात यावे. यामुळे मराठी पुस्तकांच्या विक्रीस वेग येवून मराठी पुस्तक, ग्रंथ वाचकांची संख्या वाढेल. बँक, विमा कंपन्या यांच्याकडे मराठीतून सूचना, प्रपत्रे, माहिती पुस्तिका देण्याचा आग्रह करावा. मराठीतील दररोज किमान एक तरी नवीन शब्द त्यांच्या सर्व छटांसहित नव्याने समजून घेतला पाहिजे, यामुळे कालबाहय होणाऱ्या कित्येक शब्दांना प्रवाहात आणता येईल.

**''माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टीळा**
**हिच्या संगाने जागल्या दऱ्या खोऱ्यातील शीळा''**

**श्री.राहुल एस.जावळे**
विद्यार्थी कल्याण विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१४ फेब्रुवारी २०१७ ही तारीख मी कधीच विसरु शकत नाही. कारण याच तारखेला मराठवाड्यातील कलाकारांचा आर्थिक आमचा "राष्ट्रीय युवा महोत्सव २०१७" (शिवोत्सव २०१७) कोल्हापूर मध्ये आमचे सिने अभिनेते मा.श्री. सयाजी शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार मिळाला व सत्कार ही झाला. या सत्कारामध्ये माझे दोन इव्हेंट अर्थातच स्कीच (प्रहसन) आणि मिमिक्री (नक्कल) यांना भारतातल्या ५ झोन मधल्या उच्च ८८ विद्यापीठांमधून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे A.I.U (ALL INDIA ASSOCIATION OF UNIVERSITY) चा मानाचा पुरस्कार म्हणजे 'सर्वोत्कृष्ट नाट्य गट, हा पुरस्कार आम्हाला घोषित झाला व प्रमाणित करण्यात आले. संपूर्ण भारत हे आमच्या जल्लोषामध्ये सामील झाले होते. काश्मीर ते कन्याकुमारी व राजस्थान ते मेघालय संपूर्ण उत्कृष्ट कलावंत या राष्ट्रीय महोत्सवात सामील होते ही मोठी बाब आमच्यासाठी आहे. कारण मराठवाड्याचे असून आम्ही कसला ही न्यूनगंड न पाळता आम्ही राष्ट्रीय पातळीवर विद्यापिठाचा झेंडा रोवला.

गेल्या ६ ते ७ वर्षापासून मी युवा महोत्सव करत आहे. प्रत्येक वर्षी मी मिमिक्री तर करतच होतो पण या वर्षी आमच्या विभागाचे प्रा. अनिलकुमार साळवे सर लिखीत 'कब होगी सुबह' ही स्कीट घेऊन मैदानात उतररलो, या प्रहसन मध्ये राजकीय विडंबन, व्यवस्थेची अवस्था, भारतातील गल्लीछ राजकारण व सर्वसामान्य माणसाचालढा हा इथल्या शोषण करणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात असलेला दर्शवलेला होता. यात् प्रामुख्याने सर्वसामान्य जनतेला जर विकास करायचा असले किंवा पुन्हा दाभोलकर, पानसरे, यांचे व विचारांचे खून होऊ द्यायचे नसेल, देशाला धर्मांध होऊ द्यायचे नसेल तर एकच पर्याय आहे ते म्हणजे डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले भारताचे संविधान हे एकच पर्याय आहे. हे संदेश आमच्या स्कीट मध्ये होते. आणि ते गणपत विद्यापीठ , गुजरात महेसाना वेस्ट झोन व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय यूवा महोत्सवामध्ये प्रेक्षकांना व परीक्षकांना खूप भावले, मनालाही भिडले. ही कमाल होती प्रो. अनिलकुमार साळवे सरांच्या लिखान व दिग्दर्शनाची आणि आमच्या दिमाख दर सादरीकारानांची . आज देशाला अशा विषयाची व लेखनाची गरज आहे. त्यामुळेच तिथला प्रेक्षक आम्हाला उत्कटतेने विचारत होता "ये लिखा किसने है भाई " गजब किया आप लोगो ने " ही प्रतिक्रिया आम्हाला प्रत्येक राज्यातून आलेल्याही विद्यार्थ्याकडून येत होती. कारण हे प्रहसनाला आहेच तेवढे दमदार... या प्रहसनाला भारतातून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व आंतरराष्ट्रीय साऊथ एशिया युवा महोत्सवासाठी देखील निवड झाली.

दुसरा माझा एवेंत होता मिमिक्री हे मी गेल्या ५ ते ६ वर्षापासून राष्ट्रीय पारितोषिकासाठी लढत होतो आणि शेवटच्या टप्प्यात मला भारतातून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व आंतरराष्ट्रीय साउथ एशिया युवा महोत्सवासाठी माझी निवड झाली याचा आनंदगगनात मावेनासा झाला होता. कारण पहिल्यांदाच ज्यांच्या मार्गदर्शनाखाली मी हे इवेन्ट करत होतो. ते म्हणजे प्रा. अनिलकुमार साळवे सर हे देखील तिथे उपस्थित होते. कॉलेज लेवल ते इंद्रधनुष्य आणि वेस्ट झोन ते राष्ट्रीय हा बहुमान खूप कमी लोकांना मिळतो त्यापैकी आम्ही आहोत त्यासाठी मी संघ प्रमुख प्रा. अनिलकुमार साळवे सर, तसेच प्रा. टाक सर, प्रा. दांडगे सर आणि माझे म. शि. प्र. देवगिरी महाविद्यालय प्राचार्य, नाट्यशास्त्र विभाग व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि D.S.W श्री सुहास

मोराळे सरांचे आभार व्यक्त करतो आणि एक विनंती करतो पुढच्या वर्षी ही असेच सहकार्य आम्हा कलावंताना देऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पटला पर्यंत पोहचवा... आम्ही आणि येणारे कलावंत ते ही जिंकून दाखवू... येणाऱ्या नवीन कलावंताना एवढेच सांगतो की....

ये देश तेरा, ये आझादी तेरी है ।
फिर क्यो राखला खुद को घोसलो मे
जरा पंख झटक और ले उडान,
फिर देख ये दुनिया तेरी है ।

**सद्दाम अमीन शेख**
नाट्यशास्त्र विभाग
D. B. M. 1st Year
देवगिरी महाविद्यालय
औरंगाबाद

दि. १४ फेब्रुवारी २०१७ हा दिवस अविस्मरणीय राहीलेला. आमच्या प्रत्येकांच्या आयुष्यात कारण त्या दिवशी जे झाले ते आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहासात आजपर्यंत झाले नव्हते. त्या दिवशी घडला होता इतिहास ज्याचा साक्षीदार हा संपूर्ण भारत होता असा बोललो तरी वावगे ठरणार नाही. कारण गेल्या ३२ वर्षापासून आपल्या पासून वंचीत होती ज्यांच्यासाठी प्रत्येक कलावंताची धाव असते ती म्हणजे होती ''नाट्यागटाची ढाल'' आणि ती मिळाली होती आपल्या विद्यापीठाला.

कोल्हापूर येथे १० ते १४ फेब्रुवारी २०१७ या काळावधीत All India University National youth Festival (शिवोत्सव) संपन्न झाला देशपासून आलेल्या अनेक (८८) विद्यापीठाचे कलावंत आणि त्यांना एक आम्ही सुद्धा प्रा. अनिलकुमार साळवे लिखीन दिग्दर्शित अशी स्कीट ( प्रहसन) या कलाप्रकाराला अशी स्कीट ( प्रहसन) या कलाप्रकाराला होवून आम्ही शिवोत्सवाला गेलो होतो ज्या प्रहसनास महाराष्ट्र भरात अनेक पारितोषिके होती तसेच गुजरात मध्ये झालेल्या प्रहसनास प्रथम क्रमांक मिळाला होता.

दि. १३ फेब्रुवारी २०१७ रोजी आमचे सादरीकरण होते आणि आम्ही खुप उत्साहित होतो त्याचे असेही कारण होतो की यानी याचे लेखन केले. मा. प्रा. अनिलकुमार साळवे सर हे आमच्यासोबत होते. वेळ आली आणि आमचे सादरीकरण झाले. सरांची लिखानाची शैली थोडी वेगळी होती म्हणजे प्रेक्षकांचे आणि अता तासांचे खेळ करून विद्यार्थी खिचडी खिचडी करतात अशा विनोयांनी संपूर्ण सभागृह खुष झाले. अन एकच हशा पिकू लागला. संपूर्ण सभागृह प्रेक्षक हे लेखनाचे खुप चाहते झाले आणि अनेकांना सादरीकरण ही भावले.

दि. १४ फेब्रुवारी २०१७ घडला तो हात इतिहास की प्रहसन (स्कीट) आणि मिमिक्री कलाप्रकारात द्वितीय पारितोषीक मिळाले तसेच उतकृष्ठ नाट्यगराची ढाल ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मिळवली होती. वर्तमान पत्रात ही सगळ्या गोष्टी धापून येत होत्या. आणि तो दिवस सर्वांच्या आयुष्यातला न विसरण्याजोगा क्षण बनला.

या सर्व यशाचे श्रेय प्रा. अनिलकुमार साळवे संरांच आहे अस मला वाटत कारण सरांच्या मेहनती शिवाय हे शक्य नव्हत. आणि सरांनी मेहनत करवूनही घषतली होती. या यशाला विद्यापीठाचा पाठींबा आहेच पण देवगिरी महाविद्यालयाला नाट्यशास्त्र विभागाचा खुप मोठा मान आहे शेवटी सर नेहमी बोलतात.

**।। मेहनत इतनी खामोशीसे करो की सफलता एकदीन शोर मचा दे ।।**

या रोष्ट्रीय महोत्सवातून मी काय शिकलो असे बोळायचे झाले तर मला असं वाटतं की, जसे कलावंतासाठी पुण्याला FTI, दिल्लीला NSD हे ठिकाण आहेत. शिकण्यासाठी तसेच आमच्या सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या कलावंतासाठी हे महोत्सव खुप काही शिकव्याचे ठिकाण बनले आहे. मुळात राष्ट्रीय पातळीपर्यंत येणे ही माझ्यासाठी खुप आंनदाची बाब आहे. केंद्रीय युवक महोत्सवात प्रा. अनिल कुमार साळवे सरांनी मला संधी देवून युवक महोत्सव ते राष्ट्रीय युवक महोत्सवाच्या प्रवासाची दिशा दिली. आणि सरांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवास असाचं सुरू राहील.

आमच्या सारख्या कलावंतांना अशा मोठ्या महोत्सवात जान्याचे मार्ग मोकळे करण्याबद्दल मी. D. S. W. श्री. सूहास मोराळे सरांचे तसेच संहाप्रमुख श्री. प्रा. अनिलकुमार साळवे सर. प्रा. गजानन दांडगे सर, प्रा. सुनिल टाक सर यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

**अनिल सुरेख रानडे**

देवगिरी महविद्यालय, औरंगाबाद. (नाट्यशास्त्र विभाग)

## N.S.S मधील औरंगाबाद ते दिल्लीचा अविस्मरणीय प्रवास

दि. २६ जानेवारी २०१७ रोजी प्रजासत्ता दिना निमित्त दिल्लीत येथे झालेल्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन शिबीरामध्ये मला राष्ट्रीय सेवा योजनेच्या मधून राजपथावर संचलनाची संधी मिळाली. ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी आणि अविस्मरणीय संधी राहणार आहे. महाराष्ट्रात जवळ जवळ २० लाखाहून अधिक रा. से. यो. स्वंसेवक आहेत. परंतू दरवर्षी दिल्लीत केवळ १४ स्वयंसेवकांची निवड होत असते. यामध्ये या वर्षी माझी निवड झाली होती. यात अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वर्षी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद एम. ए प्रथमवर्ष राज्यशास्त्र विभागातून. राजपथावर पथसंचालनासाठी जाण्याचा मान मला पहिल्यांदाच मिळाला. ही एक गौरवशाली बाब म्हणता येईल.

रा. से. यो. मध्ये मी गेल्या ४ वर्षापासून स्वयंसेवक म्हणून कार्य करत आहे. या मध्ये मला खुप काही शिकावयास मिळाले. माझ्यातील नेतृत्त्वगुण विकसित झाला असून त्यामध्ये समाजसेवेची भावना निर्माण झाली. त्यामध्ये रक्तदान करणे, वृक्षारोपण करणे, एड्स जनजागृती, महिला सबलीकरण, स्वछता करणे इ. समाज उपयोगी कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. मी या अगोदर देवगिरी महाविद्यालयात दोन हिवाळी शिबीरामध्ये सक्रिय सहभाग घेतला. मी या अगोदर देवगिरी महाविद्यालयात दोन हिवाळी शिबीरामध्ये सक्रिस सहभाग घेतला. त्यानंतर एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई येथे झालेल्या अव्हान (आपत्ती व्वस्थापन) शिबीरामध्ये सक्रिय सहभाग घेतला. दिल्लीत जाण्यासाठी अत्यंत थरारक कसोट्यांना खरे उतरावे लागते. त्यातून माझी निवड झाली हे मी माझे भाग्य समजतो. विद्यापीठात ७ सप्टेंबर २०१६ ला प्री. आर डी. ची निवड झाली होती त्यामध्ये विविध कॉलेज व महाविद्यालयामधून १०० मुले व १०० मुली यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून १५ मुले व १५ मुलींची निवड केली व पुढे १६,१७,१८ व सप्टेंबर २०१७ ला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे प्री एस. आर. डी., एनआरडीचे शिबीर संपन्न झाले ते संपूर्ण महाराष्ट्रामधून व विविध विद्यापीठातून ३०० मुले-मुली (स्वयंसेवक) आले होते. त्यामध्ये निवड झालेला मी एक होतो. या ३०० विद्यार्थ्यांमधून ५४ विद्यार्थी हे वेस्ट झोन प्रीआरडी कॅम्पला निवड केली व ४० विद्यार्थ्यांची निवड मुंबईत होणाऱ्या पथसंचालनालयामध्ये सहभागी होणार होते. त्या ५४ विद्यार्थ्यामध्ये आपल्या विद्यापीठातून माझ्यासह ३ मुले व ३ मुली यांची निवड झाली होती.

२ नोव्हेंबर २०१६ ते ११ नोव्हेंबर २०१६ ला एम. एस. विद्यापीठ वडोदरा गुजरात येथे वेस्ट झोन प्रीआर कॅम्प पार पाडला तेथे नऊ राज्याचे २०० मुले-मुली सहभागी झाले होते. त्या ठिकाणी परेडसाठी नेतृत्त्व करण्यासाठी संधी मिळाली. महाराष्ट्राच्या ५४ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थ्यांची निवड दिल्लीसाठी करण्यात आली. उरलेली ४० विद्यार्थी मुंबईसाठी निवडले. त्या १४ विद्यार्थ्यांमध्ये माझी निवड झाली ही माझ्यासाठी खुप अभिमानाची गोष्ट आहे. १५ डिसेंबर २०१६ विद्यापीठातून निरोप आला की, तुमची दिल्लीसाठी निवड झालेली आहे आणि या बातमीने खुप खुश झालो. आई वडीलांनाही खुप आनंद झाला होता. नंतर तयारीला लागलो. ३१ डिसेंबरला दिल्लीसाठी रवाना झालो. १ जानेवारी २०१७ रोजी दिल्लीला पहोचलो. नंतर आंबेडकर भवनला गेलो तेथे आमची राहण्याची व्यवस्था केली. २ जानेवारी २०१७ पासुन सकाळी ५ वा. उठणे त्या नंतर ६ ते ७ योगासन ७ ते ८ तयार होणे, ८ ते ९ नाश्ता, ९ ते १२ वाजे पर्यंत परेड. १२ ते १ तयार होणे, १ते २ जेवण, २ ते ४ बौध्दीक सत्र, ४ ते ६ पयेड, ६ ते ७ तयार होणे, ७ ते ९ सांस्कृतिक कार्यक्रम, ९ ते १० जेवण.

दि. १२ जानेवारी २०१७ पासून सकाळी ५ वा. राजपथावर नेण्यात आले. सकाळी खुप थंडी जाणवायची. अगदी ३ डिग्री सेलसीएस पर्यंत तापमान असायचे. तरी पण एक उत्साह निर्माण होत होता आणि अजिबात थकवा पण जाणवत नव्हता. तेथे आमच्या सोबत सकाळी परडेसाठी तिन्ही दलांचे जवान तसेच बी. एस. एफ. दिल्ली पोलीस, ब्लॅक कमांडो,

सराव करत होते. त्यांचा पाहून आमच्यामध्ये एक प्रकारचा उत्साह येत होता.

तेथे संपूर्ण २०० मुले - मुली आले होते. ते पाहुन राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण झाली होती. सगळ्यांची संस्कृती व भाषेविषयी माहिती मिळत होती. पण आम्ही सर्वजन एका कुटुंबातील आहोत अशी जाणिव झाली. मी माझे भाग्य समझतो की, एवढ्या कमी वयात भारताचे प्रथम नागरिक असणारे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी बोलण्याची व भेटण्याची संधी मला राष्ट्रीय सेवा योजने मधून मिळाली. त्यामुळे मी एक मुलगा म्हणून समाजामध्ये आई वडीलांची प्रतिष्ठा वाढविली याचा मला सार्थ वाटतो. मला जीवनात ही सूवर्ण संधी उपलब्ध करून दिली ते माझी पुजनीय आई वडील ज्यांनी मला ही दिशा दाखविली ते एन. एस. एस. कार्यक्रम समन्वयक डॉ. भिमराव भोसले. विद्यार्थी विकास संचालक डॉ. सुहास मोराळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकरी डॉ. विलास इप्पर व डॉ. निर्मला जाधव, मेजर भास्कर जाधव सर. प्रा. पी. टी. बाचेवाड सर, श्री प्रेम सलामपुरे, श्री बी. बी. वाघ. श्री. शाम बन्सवाल, श्री. सुनिल पैठणे, इ. च्या कायम ऋणात राहु इच्छितो.

**सचिन डिगांबर ढोले**

एम. ए. प्रथम वर्ष राज्यशास्त्र विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## कोवळी

कोवळी मनोगते
कृष्णाच्या मुरलीतुन येती
राधेची कोवळी मनोगते
अन् राधेच्या पैजंणातही
कृष्णाचेच प्रेमगीते

अबोल बाकी गोकुळ सारे
अबोल राधा, अबोल कान्हा
अबोल सावळ्या संध्या समयी
वाहते फक्त खळाळत यमुना

## निर्मळ खळखळ वाहताना

शुभाशुभ मुहुर्ते मी कधी मानलीच नाहीत
कळत नकळत जे काही रूजत गेले...
त्यांचच फलित ते, कुतूहलाने अंकुरत गेले
मातीतूनच जन्माला आला रंग, संवाद, संवेदनांचा एक भला मोठा पुंजका
मनाच्या मेंदूच्या चाकोरीतून बाहेर काढण्याचे श्रेय पण त्यांनाच..

त्यांनीच जाणवू दिला नाही कधी मी पणा...
म्हणूनच पहिल्या घंटेपासून - मध्यंतरी पर्यंत तरी..
शून्य होतांनाही शुभाशुभ मुहुर्ते कधी मानलीच नाही..
आणि गोठलेल्या या पांढऱ्या गर्दीतही..
निर्मळ - खळखळ वाहण्याचा पारदर्शक जीवनानंद घेता आला..
त्या माझ्या मातीतल्या हिरवळीचे त्रृण तिसऱ्या घंटेआधी फेडण्यासाठी..

**अनिल मधुकर केदारे**
विद्यार्थी विकास
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## जगायच असत!

झाल गेलेल दु:ख वळून कधी
बघायच नसत
सुख शोधण्यासाठीच तर पुढे
जगायच असत !
दु:खाचा डोंगर असेल तर
सुखाचा क्षण पण असतो.
सुख दु:खाचे कोठार
फक्त एक मानच असते.
क्षणाचेच जिवन बनवायच असत
सुख शोथण्यासाठीच तर....
दु:खाचा डोंगर असेल तर
सुखाचा सागर पण असतो
छोट्याश्या डोंगरा आड
एक विशाल सागर असतो
डोंगर चढतांना कधी हरायच नसत
सुख शोधण्यासाठीच तर.....
थेंबा थेंबाचा सागर बनतो
तर क्षणा क्षणाचा दिवस
दिवासाचे मग वर्ष बनते
तर वर्षाचेच आयुष्य
क्षणाला कधी विसरायच नसत
सुख शोधण्यासाठीच तर....

**अनिल केदारे**
एम फिल समाजशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

# अनुपमा

सत्य होती गर कही जो आदमी की कल्पना
तो उसकी सुन्दरता कुछ घट जाती
जीवन की सुन्दरता कुछ बढ जाती
प्रफुल्ल होता काश ऐसा गर कभी तो
कुछ नहीं, होती बस वो अनुपमा.

कुसुम कुंज से रहो प्रफुल्लित
ज्योति पुंज से हो आलोकित
हर पथ पर हों स्वर्ण रश्मियां
जीवन सौरभ हो हर पल मुखरित

हर क्षण हो कोकिल पंचम से कूजित
वीणा की सुर झंकार करे मन रंजित
नूतन किसलय ज्यों रहे प्रदीप्त सदा
हर पल-हो प्रमुदित - हो सुरभित.

**कल्पना भागवत**
(विद्यार्थी विकास)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# म्हणून नाही विचारलं मी तिला

ती आवडली, पण मी नाही विचारलं तिला ...
Delete करेल Friend list मधून ती मला,
म्हणून नाही विचारलं मी तिला...
बोलणार नाही माझ्याशी, म्हणून नाही विचारलं मी तिला...
चुकीच्या नजरेने पाहिल ती मला, म्हणून नाही विचारलं मी तिला...
एक गैरसमज करून घेईल ती माझ्याबद्दलचा, म्हणून नाही विचारलं मी तिला...
समोर कसा जाणार तिच्या, म्हणून नाही विचारलं मी तिला...
भेटून सुद्धा नाही भेटणार, म्हणून नाही विचारलं मी तिला...
कोणाला सांगूही शकणार नव्हतो, की किती आवडते ती मला.
कसा सांगणार मी तिला की '' आवडते ती माल? ''
भिती वाटते त्या एका '' नाही '' ची, म्हणून नाही विचारलं मी तिला...
अजून किती Velentine days निघून जातील, पण नाही विचारणार मी तिला
राहू दे मला या गोड अशा गैरसमजूतीत, की '' आवडतो मी तिला...''
'' आवडतो मी तिला...''

श्री. गजानन पालकर
विद्यार्थी विकास
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

# जी माणंस भावनाप्रधान असतात

जी माणंस भावनाप्रधान असतात
त्यांच्या स्वाभिमानाला जर जबरदस्त
धक्का लागला तर दोनापैकी एक
काहीतरी होतं.
काही माणसं गप्प बसतात,
मनातल्या मनात कुढतात,
आणि निवृत्तीचा मार्ग पत्करून
सगळं आयुष्य एखाद्या बाभळीच्या झाडासारखं
शुष्क घालवतात.
ह्या उलट काही माणंस चिडून उठतात.
सारासार विचार गुंडाळून ठेवतात
आणि मग सगळ्यांवर वार करीत सुटतात.
अशी माणसं एके काळी
भावनाप्रधान होती,
हे सांगून खरं वाटत नाही.

**स्मिता श्रीसुंदर**
विद्यार्थी विकास
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.

# आई

माया ममता भरूनी जीव लावते आई
नाही जगात कोडे अशी दूसरी ममताई...
प्रेमस्वरूप तुझे वात्सल्य तुझी स्मृती मनात ठाई
घराघरात दारादारात तुझे स्मरण होते आई...

वृक्ष जसे उन्हात न्हाउनी सर्वास साऊली
तसे मनी दुख झेलुनी सुख देते माऊली
देवाचेही भान हरपते तुझ्या ममते पाई
हात जोडून देव म्हणे तुला शरण गे आई...

अर्थहिन जीवन होता तूच देते वैभव माया
तुझ पाहून वेदना सा-या अडगळीत लपून जाई
भूक ही तुझ्या प्रेमाची शांत ना होणार आई...

गुंतलेले तुझे हात नेहमी असतात कामात
तुझी अंगाई ऐकावयास चंद्र घेऊन येई रात
स्वप्न एक ठरावे खरे पुढल्या जन्मी मिळावी पुण्याई
तुझ्याच पोटी यावा जन्म हीच आस मोठी आई...

www.premkavitaa.blogspot.com

**कल्पना भागवत**
(विद्यार्थी विकास )
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

सध्या मोठ्या शहरात जमिनीच्या किमती
आकाशाला जाऊन भिडल्या आहेत.
म्हणून आकाशाची उंची गाठू पाहणाऱ्या इमारती
मोठ्या शहरात होऊ लागल्या आहेत.
'बंगला' हे एक अजून ही 'स्वप्न' आहे.
ओनरशिप फ्लॅट हे मात्र 'वास्तव' आहे.
आपल्या बंगलात किंवा फ्लॅटमध्ये
बागेची हौस कशी करावी, याची विशेष
कल्पना कुणाला नसते. म्हणूनच अशा रसिक
लोकांसाठी घरात, बालकनीत टेरीसवर कोणती
झाडे कशी लावावीत, त्यांची कोणती काळजी
घेऊन ती कशी फुलवावीत, जोपासावीत,
यासाठी हे मार्गदर्शन.
बाग, ही घरातील असो की, घराबाहेरील असो.
ती जोपासण्यात, फुलविण्यात एक
आगळा वेगळा आनंद असतो
आपण लावलेल्या झाडांना फुलं-फळ
आलेली पहिल्यावर अनेक प्रकारचे
मानसिक ताणतणावसुध्दा कमी होतील, तसेच झाडांची निगा
करतांना शारीरिक श्रम झाले की, प्रकृतीही सुधारेल.
जागा लहान असो, की मोठी असो.
तिथं बाग करा, जागा नसेल तर कुंडीत.
खोक्यात झाडं लावा, शास्त्रोक्त पध्दतीने
ती छान फुलवा...
निसर्गाचा अमर्याद आनंद लुटा...
आनंदी व निरोगी व्हा...

**रामभाऊ पवार**
विद्यार्थी विकास
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

## षंढाचा वंश कसा वाढतोय

शंबुकाचे मुडके उडविले
बळीला पाताळी गाडले
बुध्दावर मारेकरी सोडले
चार्वाक, चक्रधरांना कुट काव्याने मारले
तुकारामाली इंद्रायणीत बुडविले
लोकराजे शिवाजीराजे, संभाजीराजेंना
दगाफटका केला
फुले शाहू, आंबेडकरांना अमाप छाळले
दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी यांना गोळ्या घातल्या
जेव्हा-जेव्हा या भूमीच्या नायकांनी
पुरोगामीत्वाचे चक्र फिरते केले
तेव्हा-तेव्हा प्रतिगाम्याने आडवाटेने सुरूंग पेरले
आजपर्यंत आमच्याच मातीत, आमचा वध होतोय
तरीही....
आम्ही उघडया डोळ्यांनी बघून गप्पच आहोत.
कधी कधी मला प्रश्न पडतो
या शूरांच्या कुळात आम्हा षंढांचा वंश
कसा वाढतोय म्हणून.....?

## उभी हयात घातली

कोरडवाहू शेतीत
बाप माझा दिनरात राबली
उगाच आयुष्याचे कितीतरी साल खर्चिले
यंदा तरी पिकेल
सारखी बोचणी मनाला
आभाळभराचं दु:ख सांगतो कुणाला
जिवाभावाचं कोण नव्हतं सोबतीला
तरी मातीचे नाते कधीना तोडला
साथ कुणाची नसताना सुध्दा...
तन, मनाने कोरडीची सेवा केली
कोरडी ती कोरडी, कधी नाही उपजली
यातच बापान माझ्या उभी हयात घातली.

**क्रांती गायकवाड**
९५२७९२७०४०
M.Phil ( मराठी )

## जीव तुटतो लाही-लाही

हाताला काम नाही
खिशाला दाम नाही
शिकुनसुध्दा फिरतोय
दाही दिशा पायी - पायी
सारे वशिल्याचे तहू इथे
बुध्दीला वाव नाही
असं वारतेय
आता कुठलाच धागा जुळणार नाही
माणसांच्या गर्दीत
मलाच शोधतोय मी
पण हा हरवलेला चेहरा
कुठेच सापडत नाही
आयुष्यभर प्रश्न सारे नडणार
तेच सोडवता - सोडवता
वेड्यागत एकटाच बडबडतो
काडे काही तुटत नाही
जीव मात्र तुटतो लाही-लाही

## पाल आजही आहे आशेवर जगत

देशाचा वतनदार उपरा होऊन
भरकत फिरतो भरक्यागत
वंचित होऊन सर्व हक्कांपासून
अन्.........
माणसापासूनही.
व्यवस्थेने जन्मत:च गुन्हेगारीचे लेबल
माथी मारले
चोरटा म्हणून कोणी ना घर उभारू दिले
हे तर जाऊधा हो
शायनिंग इंडियाच्या वाटचालीत ही
या निराधाराला कोणी आधार देईना
पाल आजही आहे आशेवर जगत.

**क्रांती गायकवाड**
९५२७९२७०४०
M.Phil ( मराठी )


## संवेदना

झगमगाराच्या दुनियेत डोळ्यावंर कातडे
ओढलेली संवेदना
पैशाच्या जाळ्यात बंदिस्त पडली आहे संवेदना
दारूच्या पेगमध्ये बर्फागत विरघळून गेली संवेदना
टि. व्ही. चित्रामध्ये गमावली संवेदना
सिमेंट कॉंक्रटच्या जमान्यात लुप्त झाली संवेदना
आधुनिक युगात जग जवळ आले
पण माणसाचे यंत्र होऊन बसल्या संवेदना
यंत्राच्या गुलाम बनल्या आहेत संवेदना
भोगवाद, चंगळवाद, स्वार्थ धुर्तपणात
बरबहून गेल्या आहेत संवेदना
मुर्दाडा सारख्या चेतनाहीन झाल्या संवेदना
प्रेमाला पोरक्या झाल्या संवेदना
माणसानेच माणसाच्या मनातून
गायब केल्या संवेदना.

## कोण वाली ना उरलां

बा, तुम्ही दिलेल्या विचार
तुमचा सारथी विसरत चाललाय
सरळ वाट सोडून,
परक्याच्या कुरणात गुरफटलाय
'बनाबाघ' बोट करून तुम्ही सांगितलं
हा मुरदाड कोल्हया-लांडग्याचा खुराक बनलाय
तुम्ही असता तर कान उधडणी केली असती
पण...
तुमच्या पाठी समाजाला तारणारा
कोण वाली ना उरलां.

**क्रांती गायकवाड**
९५२७९२७०४०
M.Phil ( मराठी )



विद्यार्थी विकास विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## २३ ऑगस्ट ५८ वा वर्धापन दिन ''जीवन गौरव पुरस्कार सोहळा''



मा. प्रोफेसर वेदप्रकाश अध्यक्ष U.G.C. यांच्या हस्ते जिवन गौरव पुरस्कार देऊन मा. डॉ. उमाकांत दांगट यांना सन्मानित करण्यात आले.



मा. प्रोफेसर वेदप्रकाश अध्यक्ष U.G.C. यांच्या हस्ते जिवन गौरव पुरस्कार देऊन मा. डॉ.प्रो. गंगाधर पानतावणे यांना सन्मानित करण्यात आले.



मा. प्रोफेसर वेदप्रकाश अध्यक्ष U.G.C. यांच्या हस्ते जिवन गौरव पुरस्कार देऊन मा. ॲड. भगवानराव देशपांडे यांना सन्मानित करण्यात आले.



मा. प्रोफेसर वेदप्रकाश अध्यक्ष U.G.C. यांच्या हस्ते जिवन गौरव पुरस्कार देऊन मा. डॉ. अशोक कुकडे यांना सन्मानित करण्यात आले.



मा. प्रोफेसर वेदप्रकाश अध्यक्ष U.G.C. यांच्या हस्ते जिवन गौरव पुरस्कार देऊन मा. प्रो. सुखदेव थोरात यांना सन्मानित करण्यात आले.